दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
संपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

बीड (महाराष्ट्र) दैनिक अंक ३३५ शुक्रवार,दि.०८ ऑगस्ट २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४
Beed | Daily Marathi | Year-5th | Issue-335 | Friday, Dt.08 August 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# विकासाच्या प्रक्रियेत पत्रकारांच्या सहकार्याची गरज - ना.अजित दादा

## संपादक वैभव स्वामी यांनी विकासाचे प्रतीकात्मक दिलेले विमान दादांना भावले...!





बीड /प्रतिनिधी

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांचा ७ ऑगस्ट रोजी बीडमध्ये जिल्हा पत्रकार संघाच्या वतीने भव्य दिव्य असा स्वागत समारंभ संपन्न झाला. या कार्यक्रमात बोलतांना ना.पवार यांनी बीड जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासाचा आढावा घेत असताना या प्रक्रियेत पत्रकारांचे सहकार्य आवश्यक असल्याचे सांगितले. येत्या १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे

(उर्वरीत पान २ वर)

### साहित्यीक,कलावंतांची उपस्थिती...

बीड जिल्हा पत्रकार संघाने आयोजित केलेल्या अजित दादांच्या स्वागत समारंभाला संगित क्षेत्रातील जेष्ठ गायक भरत अण्णा लोळगे, अनिल हंप्रस,सतीश सुलाखे, प्रकाश मानूरकर तसेच साहित्य क्षेत्रातील डॉ.विद्यासागर पाटांगणकर,प्राचार्य सविता शेटे, नाट्य क्षेत्रातील डॉ.सुधीर निकम,डॉ.संजय पाटील देवळाणकर,विनोद दळवी,आम्रपाली साबळे,शोभा सिरसाठ आदींची प्रमुख उपस्थिती होती. या सर्व साहित्यीक व कलावंतांनी उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचा प्रातिनिधीक स्वरुपात सत्कार केला.

### महिला पत्रकारांचे रक्षाबंधन...

पत्रकार संघाच्या कार्यक्रमात लाडक्या पत्रकार महिला बहिणींनी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादांना रक्षाबंधना निमित्त पत्रकार शेख आयेशा, जोस्ना चव्हाण गायकवाड,अनुप्रिता मोरे, शोभा सिरसाठ यांनी राखी बांधली.

### विकासाचे प्रतीक म्हणून दादांना वैभव स्वामींनी दिलेले विमान भेट चर्चेचा विषय ठरले...

प्रतिकूल परिस्थितीमध्ये बीड जिल्ह्याचे पालकत्व महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांना स्वीकारावे लागले.पालकत्व स्वीकारल्यानंतर अजित दादांनी बीड जिल्ह्याच्या विकासाला खऱ्या अर्थाने चालना देण्यास सुरुवात केली आहे. ७५ वर्षापासून स्वप्नात असलेली रेल्वे येणाऱ्या १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून बीड वरून अहिल्यानगर पर्यंत धावणार आहे.बीडला थेट विमानतळ दादांनी मंजूर केले. अशी एक नव्हे बीड जिल्ह्याला विकासाच्या प्रगतीवर घेऊन जाणारे अनेक निर्णय आणि निधी सुद्धा दादांनी अवघ्या तीन महिन्यात विमानाच्या भरारी प्रमाणे दिले. त्यामुळे दैनिक समर्थ राजयोगचे संपादक तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांनी दादांना विकासाचे प्रतीक म्हणून विमान भेट दिले.ही विमान भेट दादांच्या मनाला मनोमन भावली. यावर त्यांनी आपल्या मनोगतामध्ये व्यक्त केलेल्या भावनांनी सभागृहात एकच हशा पिकला आणि दिलेल्या प्रतिकात्मक भेटीवर स्वामित्व सिद्ध झाले.

### पत्रकार सन्मान योजनेत २० हजार रुपये पर्यंत वाढ

कै.बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजनेचे मानधन आता २० हजार रु.पर्यंत वाढवण्यात आले आहे. त्याबद्दल राज्याचे अर्थमंत्री म्हणून ना.अजित दादा पवार यांचा पत्रकार संघाच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला.

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घेतला विविध विकास कामांचा आढावा

**बीड जिल्ह्यातील मुख्य इमारतींचे इलेव्हेशन प्लॅन, श्री क्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग मंदिर विकास आराखडा, स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय रुग्णालय आराखडा, ग्रंथालय इमारत, सहकार संकुल आदींचा समावेश**

बीड /प्रतिनिधी

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी आज जिल्ह्यातील मुख्य इमारतींचे इलेव्हेशन प्लॅन, श्री क्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग मंदिर विकास आराखडा, स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय रुग्णालय आराखडा, ग्रंथालय इमारत, सहकार संकुल आदी विविध विकास कामांचा आढावा घेतला.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात झालेल्या या बैठकीस सर्वश्री आमदार सतीश चव्हाण, विक्रम काळे, धनंजय मुंडे, नमिता मुदंडा, संदीप क्षीरसागर, विजयसिंह पंडित, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.राजेश

(उर्वरीत पान २ वर)



## स्वातंत्र्यदिनानिमित्त आण्णा चषक भव्य टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा - नगरसेवक समीर शेख




आष्टी /प्रतिनिधी

स्वातंत्र्यदिनानिमित्त आण्णा चषक भव्य टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा (एकदिवशीय सामने) चे दिनांक १५ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ९ वा. हंबर्डे कॉलेज नगर - बीड रोड, आष्टी, ता. आष्टी, जि. बीड येथे आयोजन करण्यात आले असून संबधित स्पर्धा दिनांक १५ ऑगस्ट २०२५ रोजीच सुरु होणार आहेत. अशी माहिती आण्णा चषक भव्य टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजक नगरसेवक समीर शेख यांनी दिली आहे.

क्रिकेटमध्ये खेळाडू तयार होण्यासाठी, योग्य मार्गदर्शन, प्रशिक्षण आणि संधी मिळणे आवश्यक आहे. क्रिकेटच्या नियमांमधील मूलभूत माहिती आणि खेळण्याच्या पद्धती समजून घेणे महत्त्वाचे आहे. फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षणाच्या मूलभूत तंत्रांचा सराव करणे आवश्यक आहे. क्रिकेटसाठी आवश्यक शारीरिक तंदुरुस्ती, जसे की वेग, चपळाई आणि सहनशक्ती वाढवणे आवश्यक आहे. अनुभवी प्रशिक्षकांकडून मार्गदर्शन घेणे, खेळाडूच्या कौशल्यांमध्ये सुधारणा करण्यास मदत करते. क्रिकेट अकादमीमध्ये प्रशिक्षण घेतल्यास, खेळाडूंना अधिक व्यावसायिक दृष्टिकोन मिळतो. नियमित आणि योग्य प्रशिक्षण सत्रे खेळाडूची कामगिरी सुधारण्यास मदत करतात. शालेय आणि महाविद्यालयीन स्तरावर क्रिकेट खेळण्याची संधी मिळवा.

(उर्वरीत पान २ वर)






## संपादकीय

# समज आणि वास्तव

गाईपेक्षा म्हैस हा गोवर्गातील प्राणी उशीरा माणसाळवला गेला. कदाचित त्यामुळेच म्हशीबाबत दुजाभाव दाखवला गेला असावा. पण तरी गोमूत्राची चर्चा करताना आणि त्याचा उपयोग करताना विज्ञान काय सांगते, हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

गाईपेक्षा म्हैस हा गोवर्गातील प्राणी उशीरा माणसाळवला गेला. कदाचित त्यामुळेच म्हशीबाबत दुजाभाव दाखवला गेला असावा. पण तरी गोमूत्राची चर्चा करताना आणि त्याचा उपयोग करताना विज्ञान काय सांगते, हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

जगात अनेक संस्कृतींमध्ये उपयुक्त पशूपक्ष्यांचे पालन पूर्वीपासून केले जात आहे. गाय, म्हैस, रेनडियर, कांगारू, शेळी आणि मेंढी अशा प्राण्यांविषयी काही समज, त्यांच्यापासून मिळणाऱ्या वस्तूंचा वापर, त्यांचे पोषण आणि त्यांच्यावरील उपचारांबाबत अनेक गोष्टी प्रचलित आहेत. या धारणांना पावित्र्य आणि वर्ज्यतेचा मुलामा दिल्याने त्यांची योग्य चिकित्सा आणि संशोधन होऊ शकले नाही. त्यामुळे त्या योग्य आहेत की नाहीत हे पडताळणे कठीण झाले आहे.

आपल्या भारतीय सिंधू संस्कृतीमध्ये गाई-म्हशी-बैल यांचे पालन फार प्राचीन काळापासून सुरू आहे. अनेक पौराणिक कथांमध्ये आणि मिथकांमध्ये याचा उल्लेख आहे. आपल्याकडे बहुतांश लोक बालसंस्कारामुळे आणि 'गप्प बस' संस्कृतीमुळे 'शब्दप्रामाण्य' म्हणजे एखादी महान व्यक्ती जे सांगेल तेच खरे आणि 'ग्रंथप्रामाण्य' म्हणजे जुन्या ग्रंथात जे सांगितले आहे ते त्रिकालाबाधित सत्य मानतात.

गोमूत्र म्हणजे 'गो' वर्गातील पशूंचे मूत्र. यात बैलाच्या मूत्राचाही समावेश व्हायला हवा; पण लिंगभेद आणि भेदाभेद वृत्तीमुळे फक्त गाईचे मूत्रच महत्त्वाचे मानले जाते. विज्ञानानुसार मूत्र, मल आणि घाम हे शरीरातील उत्सर्जित (टाकाऊ) घटक आहेत. आपण हे प्राथमिक शाळेतच शिकतो. गाय आणि म्हैस हे दोन्ही एकाच 'बोव्हाईन' संवर्गात येतात. वशिंड आणि त्वचेच्या प्रकारासारखे काही तुरळक फरक वगळता त्यांची शरीर रचना, चयापचय क्रिया, अन्नग्रहण आणि उत्पादन यामध्ये खूप साम्य आहे. वेगवेगळ्या भौगोलिक रचनेनुसार त्यांच्यामध्ये गुणात्मक फरक दिसून येतो, जसे की खिलार, डांगी, लाल कंधार गाय आणि पंढरपुरी, नागपुरी, मुऱ्हा म्हैस. तुलनात्मक अभ्यास केला तर, गायीच्या दुधापेक्षा म्हशीचे दूध पौष्टिक घटक, प्रथिनं, स्निग्धांश आणि घनतेमध्ये अधिक उत्तम आहे. म्हैसपालन फक्त आशिया खंडात होते. बहुधा जंगली वास्तव्य किंवा उपद्रवमूल्य जास्त असल्यामुळे ती उशिरा माणसाळवली गेली असावी. यामुळेच, म्हैस वर्गाला मिथकांमधून आणि दंतकथांमधून खलनायकी रूपात दाखवले जाते. आजही 'रानगवा' जंगली स्वरूपात आहे. उद्या त्याची गरज भासल्यास तोही पाळीव होऊ शकतो.

गोमूत्राची उपयुक्तता प्राचीन 'चरक संहिता' आणि 'मनुस्मृती' ग्रंथात मांडलेली दिसते; पण आधुनिक विज्ञानानुसार निरीक्षण, तर्क, प्रयोग, अनुमान आणि सिद्धता यांवर आधारित अशी त्याची चिकित्सा पुराव्यानिशी झालेली दिसत नाही. तरीही, गोमूत्राला 'वॉटर ऑफ लाईफ' आणि 'नेक्टर ऑफ गॉड' म्हणजे अमृत मानले जाते.

वैज्ञानिक परिभाषेत गोमूत्रामधील (गोवर्गीय मूत्र) घटक आणि त्यांचे प्रमाण: पाणी - ९५ टक्के, युरिया - २.५ टक्के, क्षार व मिनरल्स इत्यादी - २.५ टक्के. मूत्रात नायट्रोजनचे प्रमाण जास्त असून सोडियम, सल्फर, मॅंगेनीज असे इतर घटकही असतात. हे घटक खत निर्मितीसाठी उपयुक्त असून वनस्पतींच्या वाढीसाठी योग्य पोषण देतात.

म्हशीच्या मूत्रातही सर्व घटक आणि त्यांचे प्रमाण जवळजवळ सारखेच आहे; पण त्याला पारंपरिक मान्यता नसल्यामुळे त्याची महती सांगणारे कोणी 'रक्षक' नाहीत.एप्रिल २०२३ मध्ये, देशातील सर्वोत्तम संस्था असलेल्या भारतीय पशुवैद्यकीय संशोधन संस्थेच्या (ख.त.ठ.ख.) बरेली केंद्रातील डॉ. भोजराज सिंग आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी एक संशोधन प्रसिद्ध केले आहे.

# वन्यप्राण्यांमुळे पिकांचे नुकसान

## शेतकरी पुत्र खा.सोनवणेंनी संसदेत मांडला प्रश्न,हरीण, रानडुकरांनी नुकसान केल्यास भरपाई का नाही? शेतकऱ्यांच्या आवाज दिल्लीत पोहचविला

बीड (प्रतिनिधी)

बीड जिल्ह्यात हरीण, रानडुक्करे व इतर वन्य प्राण्यांमुळे मोठ्या प्रमाणावर पिकांचे नुकसान होत आहे. नैसर्गिक आपत्ती सोबतच जंगली प्राणी उपद्रवामुळे शेतीमालाचे नुकसान बीड जिल्ह्या तील कांही भागात मोठ्या प्रमाणात होत असते.ही चिंतेची बाब आहे.हा उपद्रव रोखण्यासाठी उपाय योजना करण्याची गरज आहे.नुकसानग्रस्त शेतक-यांना पिकांची नुकसान भरपाई मिळत नाही.इतर राज्यांमधे हत्तीने पिकाचे नुकसान केले तर भरपाई मिळते पण आमच्या शेतकऱ्यांना हरीण, रानडुक्कर यांनी नुकसान केल्यानंतर नुकसान भरपाई का मिळत नाही? असा सवाल उपस्थित करत वन्यप्राण्यांकडून होणाऱ्या पिकांच्या नुकसानीची भरपाई मिळावी तसेच हा उपद्रव रोखण्यासाठी शाश्वत उपाययोजना कराव्यात,अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी संसदेत केली. जिल्ह्यातील शेतकरी पुत्र म्हणून खा.सोनवणे यांची ओळख असून ते वारंवार शेती प्रश्नावर आवाज उठवित आहेत.

कृषी व शेतकरी कल्याण राज्यमंत्री रामनाथ ठाकुर यांनी दिलेल्या लेखी उत्तरात म्हटले आहे,पंतप्रधान पीक विमा योजनेत नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या पिकांच्या नुकसानीस संरक्षण मिळते तसेच शेतीला कुंपण घालण्यासाठी राज्य सरकारे उपाय योजना करतात मात्र, जंगली प्राण्यांमुळे होणारे नुकसान हे टाळता येण्यासारखे असल्याने आधी या योजनेत त्याचा समावेश नव्हता.पर्यावरण,वन व हवामान बदल मंत्रालय तसेच विविध राज्य सरकारांच्या विनंती नंतर,राज्य सरकारांना या नुकसानीचा 'ड-ऑन कव्हर' स्वरूपात समावेश करण्याची परवानगी देण्यात आली आहे. तथापि,महाराष्ट्र सरकार ने आतापर्यंत हा पर्याय लागू केलेला नाही. तसेच केंद्र सरकार कडून 'डेव्हलपमेंट ऑफ वाइल्डलाईफ हॅबिटॅट्स', 'प्रोजेक्ट टायगर' आणि 'प्रोजेक्ट एलिफंट' या योजने अंतर्गत राज्यांना आर्थिक मदत दिली जाते.यामध्ये काटेरी तारांचे कुंपण,सोलार ऊर्जेवर चालणारे कुंपण,कॅक्टसची जिवंत फेन्सिंग,भिंती इत्यादींची उभारणी करून पिकांमध्ये जंगली प्राण्यांची घुसखोरी रोखण्याच्या उपायांचा समावेश आहे.बीड जिल्ह्यात हरीण,रानडुकरांमुळे शेतीचे मोठे नुकसान होत आहे.शेतकऱ्यांना वन्यप्राण्याने केलेल्या नुकसानीची भरपाई मिळावी,शिवाय पिक वाचविण्यासाठी व्यवस्था निर्माण करावी अशी मागणी खा. बजरंग सोनवणे यांनी केली आहे.

अशा आहेत महत्वाच्या मागण्या

महाराष्ट्रात पंतप्रधान पीक विमा योजनेच्या ड-ऑन कव्हरमध्ये हरिण व रानडुकरांमुळे होणाऱ्या पिकांच्या नुकसानीचा समावेश करण्यास तात्काळ मान्यता द्यावी.हा पर्याय लागू झाल्या नंतर शेतकऱ्यांना त्याबाबत योग्य ती माहिती व मार्गदर्शन उपलब्ध करून द्यावे, जेणेकरून ते वेळेत या योजनेचा लाभ घेऊ शकतील.तसेच,केंद्र व राज्य योजनांद्वारे उपलब्ध असलेल्या सोलार किंवा तारांचे कुंपण,भिंत बांधकाम इत्यादी प्रतिबंधात्मक उपायांना ही अधिक बळकटी द्यावी.

### मुख्यमंत्र्यांकडेही केली मागणी

केंद्रशासनाच्या निर्णया मुळे शेतकऱ्यांना आवश्यक ती आर्थिक सुरक्षा मिळेल आणि शेतीसंबंधी टाळता येणाऱ्या धोका घटकां पासून संरक्षण मिळेल, मात्र महाराष्ट्र राज्यातील सर्वदूर भागामधे रानडुक्कर,हरिणे तसेच इतर जंगली प्राणी याचा शेतास होत असलेल्या उपद्रवामुळे शेतकरी त्रस्त आहेत.त्यामुळे प्रधानमंत्री पीक विमा योजनेमधे केंद्र शासना च्या निर्देशानुसार ड-ऑन कव्हरमधे रानडुक्करे,हरिणे व इतर जंगली प्राण्यांमुळे होत असलेल्या नुकसानीचा समावेश करावा व अशाभागामधे शेतीला कुंपण घालून हा उपद्रव रोकण्यासाठी उपाययोजना करव्यात यासाठी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यांना खा.बजरंग सोनवणे यांनी पत्र देऊन मागणी केली आहे.

**मा.श्रीमती. एस. डी. सोनी, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज १२४४/२०२५**
**केशरबाई तुकाराम कुर्लेकर व ईतर विरूध्द निरंक**

अर्जदार
१. केशरबाई भ्र. तुकाराम कुर्लेकर, वय ७३ वर्षे, धंदा घरकाम, रा. वंजारवाडी, ता. जि. बीड
२. सुग्रीव पि. तुकाराम कुर्लेकर, वय ५३ वर्षे, धंदा-शेती, रा. सदर
३.पंडित पि. तुकाराम कुर्लेकर, वय ४९ वर्षे धंदा-शेती, रा. सदर ह.मु. फरसुंगी पुणे.
४.कालीदा भ्र. रूहिदास शिंदे, वय ४७ वर्षे, धंदा-घरकाम, रा. कुमशी ता. जि. बीड
५.कविता भ्र. बाबासाहेब कुर्लेकर, वय ५० वर्षे, धंदा- घरकाम, रा. वंजारवाडी, ता. जि. बीड
६. विद्या भ्र. धनराज कदम, वय २६ वर्षे, धंदा-घरकाम,रा. वंजारवाडी, ता. जि. बीड
७. मोनिका पि. बाबासाहेब कुर्लेकर, वय ०७ वर्षे, धंदा-शिक्षण रा. वंजारवाडी, ता. जि. बीड अ.पा.क. अज्ञान पालनकर्ता अर्जदार क. ६ आई

विरुध्द निरंक

मागणी- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत तुकाराम पि. पुंजा कुर्लेकर, यांचा मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी मयत तुकाराम पि. पुंजा कुर्लेकर, यांचा मृत्यु दिनांक ३०/०७/२०१७ रोजी झाला आहे. यांचा मृत्यु वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत....

मयत तुकाराम पि. पुंजा कुर्लेकर, यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत तुकाराम पि. पुंजा कुर्लेकर, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०४/०८/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्कयाने दिले.

सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १०/०९/२०२५ आहे.

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व.स्तर,गेवराई



## हरित बीड अभियान अंतर्गत बोरगाव येथे वृक्षारोपण

केज/प्रतिनिधी

हरित बीड जिल्हा अभियान अंतर्गत व जिल्हाधिकारी श्री. विवेक जॉन्सन यांच्या संकल्पनेतून वीस लाख वृक्षारोपण महा वृक्षारोपण कार्यक्रम मोहिम राबविण्यात आली. त्या अंतर्गत सर्व ग्रामपंचायत मध्ये शाळा महाविद्यालय तालुका स्तर गाव पातळीवर असे मिळून वीस लाख झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले हे उद्दिष्ट ठेवून येणाऱ्या काळात एक कोटी वृक्ष लागवड करण्यात येणार आहे आज बोरगाव ग्रामपंचायत अंतर्गत गावात अकराशे रोपे लावून वृक्षारोपण करण्यात आले यावेळी उपस्थित सरपंच गव्हाणे,ग्रामपंचायत अधिकारी कोकाटे, ग्रामपंचायत महसूल अधिकारी मॅडम संपर्क अधिकारी विश्वास राऊत तसेच माध्यमिक शाळेचे शिक्षक,विद्यार्थी पालक,गावकरी वृक्षारोपण कार्यक्रमात मोठ्या संख्येनेउपस्थित होते.

**टी.सी. हरवला आहे**

युवराज हनुमान पंडित या नावाचा १० वी पास चा टी.सी. दैठण ते गेवराई या प्रवासा दरम्यान हरवला आहे. तरी कोणाला सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

संपर्क -: ८२०८७०२९०९

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्रीमती. एस एच पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक: ६६६ / २०२५**
देविदास भानुदास कातखडे विरुध्द निरंक
**(मार्फत अ‍ॅड. डोईफोडे जी एस)**

ज्याअर्थी मयत नामे भानुदास गणपतराव कातकडे हे दिनांक १५.०८.२००५ रोजी कोल्हेर, ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले आहेत.

अर्जदार
१. देविदास भानुदास कातकडे
वय ७५ वर्षे धंदा-शेती
रा. कोल्हेर ता. गेवराई जि. बीड
२. रामदास भानुदास कातकडे
वय ६५ वर्षे धंदा शेती
रा. कोल्हेर ता. गेवराई जि. बीड
३.तुळशीराम भानुदास कातकडे
वय ६० वर्षे धंदा शेती
रा. कोल्हेर ता. गेवराई जि. बीड

शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या छ घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे भानुदास गणपतराव कातकडे रा. कोल्हेर ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख : ०४.१०.२०२५

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्रीमती. एस एच पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक: ६५१ / २०२५**
अदिती रुस्तम बेदरे विरुध्द - निरंक
**(मार्फत अ‍ॅड. डोईफोडे जी एस)**

ज्याअर्थी मयत नामे सुनिता रुस्तुम बेदरे हे दिनांक १४.१०.२०२२ रोजी बेलगाव, ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले आहेत.

अर्जदार
१.अदिती रुस्तुम बेदरे वय १५ वर्षे धंदा शिक्षण अ.पा.क. वडील रुस्तुम भिवसेन बेदरे रा. बेलगाव ता. गेवराई जि. बीड
२.वेदीका रुस्तुम बेदरे वय ११ वर्षे धंदा शिक्षण अ.पा.क. वडील रुस्तुम भिवसेन बेदरे रा. बेलगाव ता. गेवराई जि. बीड
३. संस्कृती रुस्तुम बेदरे वय ०९ वर्षे धंदा शिक्षण अ.पा.क. वडील रुस्तुम भिवसेन बेदरे रा. बेलगाव ता. गेवराई जि. बीड
४. रुस्तुम भिवसेन बेदरे वय ४९ वर्षे धंदा मजुरी रा. बेलगाव ता. गेवराई जि. बीड

शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता

मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या छ गोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे सुनिता रुस्तुम बेदरे रा. बेलगाव ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख : ०९.०९.२०२५

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

पान १ वरुन...

**विकासाच्या प्रक्रियेत....**

औचित्य साधुन बीड ते अहिल्यानगर ही रेल्वे सुरु करण्याचा प्रयत्न असल्याचे अजित दादांनी स्पष्ट केले. आपल्या मनोगतामध्ये ते म्हणाले, मला आज या सत्कार सोहळ्यात दैनिक समर्थ राजयोगचे संपादक वैभव स्वामी यांनी विकासाचे प्रतीक म्हणून जे विमान भेट दिले आहे ते माझ्या कायम स्मरणात राहील.

हॉटेल निलकमलच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला आ.प्रकाश दादा सोळंके, आ.विजयसिंह पंडित, आ.विक्रम काळे, उपमुख्यमंत्री यांचे सचिव आयुक्त डॉक्टर राजेश देशमुख, बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जतिन रहमान,बीड विधानसभा राष्ट्रवादीचे अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, राष्ट्रवादी कॉंग्रेस ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याण काका आखाडे,जिल्हाध्यक्ष ॲड.राजेश्वर चव्हाण, बीड शहराध्यक्ष अमर नाना नाईकवाडे यांची उपस्थिती होती. सर्वप्रथम महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे आणि बीड जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष मानूरकर यांच्या हस्ते ना.अजित दादा पवार यांचा शाल,श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देवून यथोचित सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना संतोष मानूरकर यांनी अजित दादांच्या कार्यकाळात बीड जिल्ह्यामध्ये झालेल्या विविध विकास प्रकल्पांची माहिती दिली.बीड शहराच्या जायकवाडी बॅक वॉटर योजनेला मान्यता देण्याचे काम अजित दादांच्या नेतृत्वाखाली झाले होते. आणि आज बीडचे पालकमंत्री म्हणून विकासाच्या बाबतीत बीड जिल्हा सर्वांगिण प्रगती करत असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रसंगी बोलतांना पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी बीड जिल्ह्याच्या सामाजिक आणि भौगोलिक परिस्थितीचा आलेख मांडला.या पुर्वी विलासराव देशमुख यांनी बीड जिल्ह्याचे पालकमंत्री पद भुषवले होते. त्यानंतर ते मुख्यमंत्री झाले. तोच योग अजित दादा पवार यांच्या बाबतीत घडून यावा अशी अपेक्षा मुंडे यांनी व्यक्त केली.

या कार्यक्रमात बोलतांना उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी गेल्या दोन दिवसात जिल्ह्याच्या विकास प्रक्रियेत घेण्यात आलेले निर्णय तसेच बैठकांची माहिती दिली. बीड जिल्हा विकासाच्या बाबतीत गतीमान करण्यासाठी माझे प्रयत्न सुरु आहेत. प्रशासनात पारदर्शकता येण्यासाठी चांगल्या अधिकार्यांची नियुक्ती आपण केली आहे.नवीन प्रशासकिय इमारती दर्जेदार पध्दतीने व्हाव्यात यासाठी बांधकाम विभागाचे तज्ञ अधिकारी काम पहात आहेत. बीड शहरातील विद्युत पोल वरील तारांचे जाळे कमी करणे आवश्यक आहे. ज्यामुळे शहराचे सौंदर्य आणखी वाढेल. या सर्व गोष्टी करताना काही कठोर निर्णय सुध्दा आम्हाला घ्यावे लागतील. त्यासाठी नागरिकांनी आणि पत्रकारांनी सहकार्य करावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.बीड जिल्हा पत्रकार संघाने केलेल्या सत्काराबद्दल समाधान व्यक्त करताना अजित दादा म्हणाले की, काम करत राहणे हा आमचा पिंड आहे. केलेल्या कामाचे प्रदर्शन न करता ही आपली जबाबदारी आहे असे आम्ही समजतो.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री.जाधव सर यांनी केले तर आभार प्रदर्शन दैनिक समर्थ राजयोगचे संपादक वैभव स्वामी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पत्रकार सर्वश्री अमोल पटवारी, नितीन क्षीरसागर, बालाजी तोंडे, शेख रिजवान, शेख ताहेर, शेख आयेशा, शेख अब्दुल, चंद्रकांत पाटील, अनुप्रिता मोरे आदींनी परिश्रम घेतले.

**उपमुख्यमंत्री अजित पवार ....**

देशमुख, आदिवासी विकास विभागाचे सचिव तथा जिल्ह्याचे पालक सचिव विजय वाघमारे, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण आदी उपस्थिती होते.

बीड जिल्ह्याकरीता महसुल भवन, जिल्हाधिकारी कार्यालय तसेच प्रशासकीय इमारती उभारण्यात येत आहे. या सर्व इमारती एकाच परिसरात एकसमान उभारण्यात याव्यात. तसेच जिल्ह्याकरीता उभारण्यात येणारे जिल्हा ग्रंथालय, सहकार भवन या इमारती सुसज्ज आणि सर्व सुविधा असलेल्या उभारण्यात याव्यात.संबंधीत विभागानी या इमारतीमध्ये अधिकारी-कर्मचारी आणि नागरिकांसाठी सर्व सुविधा उपलब्ध होतील यासाठी प्रयत्न करावा. या सर्व प्रशासकीय इमारती उभारण्याचे काम अतिशय गतीने आणि दर्जेदार होतील याकडे लक्ष द्यावे. तसेच प्रत्येक इमारतीमध्ये सुर्यप्रकाश, व्हेंटीलेशन आणि सोलर सिस्टीमचा समावेश करावा.

तसेच स्वामी रामानंद तीर्थ ग्रामिण वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय, सुमारे ५० वर्ष जूने

पान १ वरुन...

असुन, ज्या इमारती कालबाह्य झाल्या आहेत, त्या इमारती धाराशिव येथील शासकीय वैद्यकीय रुग्णालयाच्या धर्तीवर उभारण्यासाठीचा विकास आराखडा तयार करावा. तसेच या रुग्णालयात रुग्णांना अत्याधुनिक वैद्यकीय उपचारांच्या सुविधा येथे उपलब्ध करण्यासाठी प्रस्ताव तयार करुन पाठवावा. तसेच याठिकाणी काम करणारे अधिकारी-कर्मचारी यांची निवासस्थाने सुसज्ज व सर्व सुविधा असतील याची काळजी घ्यावी. रुग्णालयाच्या विकासासाठी नियमानुसार जे काही लागणार आहे, त्याचा प्लॅन तयार करुन सादर करावा.त्यास मान्यता आणि निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाकडून परळी वैजनाथ येथे रु.२८६.६८ कोटींचा तिर्थक्षेत्र विकास आराखड्यास सुधारित प्रशासकिय मान्यता देण्यात आली होती. या प्रकल्पात काही बदल सुचवून रु. ३५१.०० कोटी रक्कमेच्या सुधारित आराखड्यास जिल्हास्तरीय समितीमध्ये मान्यता देण्यात आली. आता हा आराखडा अंतिम मान्यतेसाठी शासनाकडे सादर करण्यात आला आहे. त्यास लवकरच मान्यता प्राप्त करुन घेण्यात येईल. परंतू श्री क्षेत्र परळी वैजनाथ मंदिरास त्याचे पूरातन मुळ स्वरुप प्राप्त करण्यासाठीचा तसेच मंदिर परिसराचा विकास आराखडा तयार करावा. यावेळी उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी उभारण्यात येणाऱ्या सर्व इमारतीची संबंधीत अधिकारी आणि वास्तूरचनाकार यांच्याकडून सविस्तर आढावा घेवून आवश्यक त्या सूचना दिल्या.

मुक्ती संग्राम दिनापासून बीड ते अहिल्यानगर रेल्वे धावेल यासाठी प्रयत्नशील...

बीड - अहिल्यानगर रेल्वे मार्गाचे काम पूर्ण झाले असून त्याची चाचणी देखील यशस्वी झाली आहे. मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनापासून बीड-मुंबई रेल्वे सुरु व्हावी यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही उपमुख्यमंत्री अजित पवार यावेळी म्हणाले. तसेच अंबेजागाई येथील लमान तांडा येथे नवीन कारागृहासाठी लागणाऱ्या जागेसाठी पाठपूरावा करुन यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच कंकालेश्वर देवस्थानाची असलेली १२ एकर जागेस संरक्षण भिंत उभारण्यासाठी प्रस्ताव तयार करुन सादर करावा असे निर्देश दिले.

महसूल भवनाचे भूमिपूजन...

जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील महसुल भवनाचे उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते आज भूमिपूजन झाले. यावेळी उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगतीपथावर असलेल्या नवीन इमारतीच्या बांधकामाची देखील पाहणी करत संबंधीतांकडून महसूल भवन आणि जिल्हाधिकारी कार्यालयाची माहिती घेवून संबंधीतांना आवश्यक त्या सूचना केल्या. तसेच इमारतीचे काम दर्जेदार करण्याच्या सूचनाही संबंधीताना त्यांनी दिल्या.यावेळी सर्वश्री विक्रम काळे, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.राजेश देशमुख, आदिवासी विकास विभागाचे

पान १ वरुन...

सचिव तथा जिल्ह्याचे पालक सचिव विजय वाघमारे, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण आदी उपस्थिती होते.

**स्वातंत्र्यदिनानिमित्त आण्णा....**

स्थानिक आणि विभागीय स्पर्धांमध्ये सहभागी व्हा, ज्यामुळे खेळाडूंना अनुभव मिळतो. राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये भाग घेण्याची संधी मिळाल्यास, खेळाडूची कारकीर्द अधिक चांगली होऊ शकते. खेळाडूने स्वतःवर विश्वास ठेवणे आणि सकारात्मक दृष्टिकोन ठेवणे आवश्यक आहे. क्रिकेटमधील दडपण हाताळण्याची क्षमता विकसित करणे, खेळाडूसाठी खूप महत्त्वाचे आहे. प्रत्येक सामन्यात जिंकण्याची जिद्द असणे, खेळाडूसाठी आवश्यक आहे. क्रिकेटमधील तज्ञांचे व्हिडिओ पाहून, त्यांचे तंत्रज्ञान आणि डावपेच शिकणे उपयुक्त ठरते. आपल्या चुकांमधून शिकून, त्यात सुधारणा करणे, खेळाडूसाठी आवश्यक आहे. क्रिकेटमध्ये यशस्वी होण्यासाठी, या सर्व गोष्टी एकत्रितपणे करणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील युवकांचा क्रिकेट खेळाकडे ओढा वाढावा, गुणवान खेळाडू तयार व्हावेत या उदात्त हेतूने स्वातंत्र्यदिनानिमित्त आण्णा चषक भव्य टेनिस बॉंल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. अशी भावना आयोजक नगरसेवक समीर शेख यांनी व्यक्त केली.सदरील स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रवेश फीस तिन हजार रुपये असून प्रथम बक्षीस एकवीस हजार रुपये, द्वितीय बक्षीस अकरा हजार रुपये आहे. मॅंन ऑंफ द सिरीज साठी सिआरआयसी स्पोर्टस जामखेड व उत्कृष्ट गोलंदाजासाठी रमेश बोडखे सरांतर्फे बक्षिस दिले जाणार आहे.स्पर्धेसाठी पुढीलप्रमाणे नियम व अटी आहेत. पंचाचा निर्णय अंतिम राहील, प्रत्येक सामन्यात एक सामनावीर, सामना ६ षटकांचा राहील, सर्व निर्णय आयोजकाकडे राहतील, एक खेळाडू एका संघात खेळला जाईल, गैरवर्तन करणाऱ्या संघाला बाद केले जाईल, पाऊस आल्यास रबर बॉलने सामना खेळला जाईल. याप्रसंगी प्रमुख आकर्षण आर. व्ही. ऑंडिओ डी. जे., ऑंपरेटर सोनु डि. जे. असणार आहे. स्पर्धेच्या प्रवेशासाठी सय्यद अयाज मो. ९८६०१०२५२५, मुन्ना शेख मो. ९६७३१०१११८, सत्तार पठाण मो. ९९७०३८३५३७, नुमान शेख मो. ७८२१९६९६९५, शेहबाज पठाण, इम्रान शेख, अन्वर सय्यद, सोनु बी. एम. यांच्याशी संपर्क करावा असे आयोजकांनी कळविले आहे.

स्पर्धेसाठी बॉल सौजन्य आयशा फिश मर्चेंट, चहा सौजन्य बी. एम. टी सेंटर, पाणी सौजन्य त्रिशा अँक्वा (प्रोप्रा. रिकी राजगुरू) यांचे असणार आहे. असे आयोजक नगरसेवक समीर शेख (फ्रेड्स सर्कल, आष्टी) यांनी शेवटी सांगितले आहे.

# दोन महिने वीज देयक थकल्यास सुरक्षा ठेवीतून होणार कपात

## दरमहा वीजबील भरण्याचे महावितरणचे आवाहन

बीड /प्रतिनिधी

दोन महिने ज्या वीजग्राहकांचे वीज देयक थकेल त्यांच्या सुरक्षा ठेवीतून थकबाकीची रक्कम कपात केली जाईल, असा नवीन नियम महावितरणने जुलैपासून लागू केला आहे. त्यामुळे थकबाकीदार वीजग्राहकांनी नियमीतपणे दरमहा वीज देयक भरावे असे आवाहन महावितरणने केले आहे.

सर्व वर्गवारीतील ग्राहकांकडे वीज देयकाची थकबाकी प्रत्येक वर्षी वाढत आहे. यामुळे महावितरण कंपनी आर्थिक अडचणीत सापडली आहे. त्यामुळे आता सलग दोन महिन्यांचे वीज देयक थकल्यास तिसऱ्या महिन्यात वीज ग्राहकांच्या सुरक्षा ठेवीतून थकबाकीची रक्कम कपात केली जाणार आहे. ही रक्कम एकदा कपात झाली की नंतर वीज ग्राहकाला प्रथम सुरक्षा ठेवीची रक्कम व त्यानंतर देयकातील इतर शिल्लक रक्कम भरणे बंधनकारक असेल. महावितरणकडून प्रत्येक वर्षी वाढीव वीज देयकानुसार पाठवले जात असलेल्या सुरक्षा ठेवीची रक्कम ज्या ग्राहकांनी भरली नसेल त्याला ही संपूर्ण रक्कम भरावी लागेल. त्यानंतरच संबंधित ग्राहकाचे शिल्लक देयक भरता येईल. ही रक्कम न भरल्यास ग्राहकाचा वीजपुरवठा खंडित केला जाईल. त्यानंतर ग्राहकाला पुरवठा पुन्हा सुरू करण्यासाठी सुरक्षा ठेव, देयकाची थकबाकी भरावी लागेल. वीज जोडणी शुल्क भरूनच वीज जोडणी पूर्ववत करता येऊ शकेल.हा नियम लागू होण्यापूर्वी दोन महिन्यांचे देयक थकल्यास तिसऱ्या महिन्यात पंधरा दिवसांची नोटीस दिली जात होती. त्यानंतरही देयक नभरल्यास वीजपुरवठा तात्पुरता खंडित केला जात होता. कायम वीजपुरवठा खंडित झाल्यावर मात्र सुरक्षा ठेवीतील रक्कम थकबाकीतून वळती केली जात होती.महावितरण सातत्याने एसएमएस, ईमेल तसेच मोबाईल व्दारे संपर्क करत थकीत वीज बील भरण्याबाबत वीजग्राहकांना अवगत करत असते. मात्र या ना त्या कारणांमुळे बील भरण्यास ग्राहक टाळाटाळ करतात परिणामी वीजपुरवठा खंडीत करण्याची कटू कारवाई करावी लागते. मात्र आता दोन महिन्याच्यावर थकबाकी राहील्यास थकीत बीलाची रक्कम सुरक्षा ठेवीच्या रकमेतून कपात करण्यात येत आहे. सोबतच सुरक्षा ठेव बीलातून वजा जाता उर्वरीत वीजबील नवीन सुरक्षा ठेवीच्या रकमेसह वीजबील स्विकारत आहे.

# बीड जिल्ह्याला हरित, समृद्ध बनविण्यासाठी सर्वांचे सहकार्य आवश्यक - राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार







बीड /प्रतिनिधी

हवामान बदल, वाढते प्रदूषण, पाण्याची टंचाई यामुळे वृक्ष लागवड ही काळाची गरज झाली आहे. बीड जिल्ह्याने एकाच दिवशी ३० लाखांहून अधिक रोपांची लागवड करून विक्रम प्रस्थापित केला आहे. त्यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी हरित बीड अभियानात सहभागींचे कौतुक केले. या रोपांचे संवर्धन, संगोपनाची जबाबदारी आपणा सर्वांची आहे. जिल्हा प्रशासनाने वर्षभरात एक कोटी रोपांची लागवड करण्याचा संकल्प केला आहे. त्यासाठी सर्वांनी पुढाकार घेऊन हरित बीड अभियानाचा संकल्प पूर्णत्वास न्यावा, असे आवाहन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांनी केले.

हरित महाराष्ट्र समृद्ध महाराष्ट्र अभियानांतर्गत हरित बीड अभियानाचा शुभारंभ पालकमंत्री पवार यांच्याहस्ते रोपाची लागवड करून आज झाला. हा कार्यक्रम खंडेश्वरी मंदिर परिसरात पार पडला.

या अभियानांतर्गत आज जिल्ह्यात विविध ठिकाणी एकाच दिवशी ३० लाख स्थानिक प्रजातींच्या रोपांची लागवड जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आली. याची नोंद इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये घेण्यात आली. त्यानुसार इंडिया बुक ऑफ रेकॉर्डचे प्रतिनिधी अशोक अदक यांच्याकडून पालकमंत्री यांना प्रमाणपत्र, पदक सुपुर्द करण्यात आले. तर पालकमंत्री पवार यांच्याहस्ते हे प्रमाणपत्र व पदक जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना वितरीत करण्यात आले.

या कार्यक्रमास उद्योग मंत्री उदय सामंत, सर्वश्री आमदार सतीश चव्हाण, विक्रम काळे, प्रकाश सोळंके, अमरसिंह पंडित, संदीप क्षीरसागर, विजयसिंह पंडित, नमिता मुंदडा, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.राजेश देशमुख, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, उद्योग विभागाचे सह मुख्य कार्यकारी अधिकारी कुणाल खेमनार, जिल्हा प्रशासनातील सर्व वरिष्ठ अधिकारी आदींची उपस्थिती होती.

पालकमंत्री श्री.पवार म्हणाले, हरित महाराष्ट्र समृद्ध महाराष्ट्र अभियानांतर्गत यापुढे दरवर्षी २५ कोटी वृक्षांची लागवड करणार आहे. आगामी चार वर्षात १०० कोटी रोपांची लागवड करण्याचे ध्येय शासनाचे आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 'एक पेड माँ के नाम' यामध्येही शासनाची चांगली कामगिरी आहे. वन आच्छादन ३३ टक्के असण्यासाठी वृक्ष लागवड मोहीम महत्त्वपूर्ण ठरणार आहे. राष्ट्रीय, राज्य महामार्गाच्या दुतर्फा बाजूंनी स्थानिक प्रजाती असलेली रोपे लावण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

उद्योग मंत्री श्री.सामंत यांनीही बीड जिल्ह्याच्या वृक्षारोपण कार्यक्रमाचे कौतुक केले. वृक्ष संवर्धन आणि संगोपन ही आपली सर्वांची जबाबदारी असून प्रत्येकाने ती पार पाडावी, असे आवाहन केले. शिवाय बीड येथे उभारण्यात येत असलेल्या सीट्रीपलआयटीच्या माध्यमातून जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाला नक्कीच गती मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. वृक्ष लागवड अभियानातून बीड जिल्हा विकासाच्या दृष्टीने वाटचाल करत असल्याचेही ते म्हणाले.कार्यक्रमाची सुरूवात दीपप्रज्वलनाने झाली. प्रास्ताविक जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले. यामध्ये त्यांनी जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या हरित बीड अभियानाबाबत सविस्तर माहिती दिली. याच कार्यक्रमामध्ये पालकमंत्री श्री.पवार यांच्याहस्ते जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, जिल्हा नियोजन अधिकारी रवींद्र चिंचाणे, वडवणीचे गट विकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे आणि सुदर्शन राख यांना आंकांक्षित तालुका अभियानांतर्गत वडवणी तालुक्याने देशपातळीवर ६१ वा आणि राज्यात दुसरा क्रमांक मिळवल्याबद्दल पालकमंत्री पवार यांच्याहस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

## शेत पिकाच्या डॉक्टर बनताहेत शेतकरी महिला !

### कृषी तज्ञांकडून महिलासाठी राबवली जाते शेतशाळा मोहिम !



ना खडू ना फळा मस्त आहे महिलांची शेतशाळा !

मानूर (प्रतिनिधी)

बदलत्या शेतीव्यवसायात आता महिला देखील नव्या तंत्रज्ञानाच्या भागिदार बनत असुन आपल्या शेतातील शेतपिकाच्या डॉक्टर म्हणून तालुका कृषी कार्यालयाच्या माध्यमातून महिलाची शेतशाळा ही मोहिम सुरू केली असुन शेतकरी महिला चांगला प्रतिसाद देत आहेत .

नानाजी देशमुख कृषी संजिवनी प्रकल्प टप्पा क्र दोन हा वारणी या गावांत महिला शेतशाळेतून खत व्यवस्थापन ,किड नियंत्रण ,पक्षी थांबे ,पाणी व्यवस्थापन ,दशपर्णी अर्क तयार करणे कामी धडे दिले गेले .

तालुका कृषी अधिकारी राजेंद्र नेटके यांचे मार्गदर्शनाखाली मंडळ अधिकारी कृष्णा नागरगोजे ,लिंबाजी काटकर ,कृषी सेवक आरती वक्ते ,स.कृ.अ.कविता ढाकणे यांनी गुरूजीच्या भुमिकेतून महिलांना धडे देण्याचे काम केले .महिला शेतशाळेसाठी महिला सरपंच प्रियंका केदार लोणीच्या सरपंच सायली बडे यांनी मोलाचे सहकार्य केले .हातात शेत काम असणे जसे महत्वाचे तसे आपल्या पिकाचे आरोग्य सुदृढ असणे गरजेचे असुन त्यासाठी महिलांनी शेतशाळेतून कांही मुलभुत मंत्र आत्मसात केल्याचे कविता ढाकणे यांनी सांगितले .

## कानडीमाळी येथे एक पेड मा के नाम २.० अभियानअंतर्गत वृक्ष लागवड मोहिमेचे यशस्वी आयोजन



केज/प्रतिनिधी

कानडीमाळी ता.केज जि.बीड येथे पर्यावरण संवर्धनाच्या उद्देशाने माननीय जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने बीड जिल्ह्यात एक कोटी वृक्ष लागवडीचे ध्येय दिनांक ७ जुलै रोजी आयोजित करण्यात आले होते.कानडीमाळी परिसरात भव्य वृक्ष लागवड मोहीम राबविण्यात आली.या मोहिमेंतर्गत सुमारे १००० वृक्षांचे लागवड यशस्वीरित्या पूर्ण झाली असून परिसर आता हरित क्षेत्रात रूपांतरित होत आहे.ही मोहिम ग्रामस्थांच्या सहभागाने आणि स्थानिक स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने पार पडली.शालेय विद्यार्थ्यांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनी उत्साहाने या उपक्रमात सहभाग नोंदवला. लागवड केलेल्या वृक्षांमध्ये आंबा, सागवान,चिंच,कडुलिंब, बाभळी आदी देशी व पर्यावरणपूरक प्रजातींचा समावेश आहे.या उपक्रमाबद्दल बोलताना ग्रामपंचायतचे सरपंच श्री.अशोक राऊत यांनी सांगितले की,पर्यावरणाचे रक्षण ही काळाची गरज आहे. वृक्षलागवड ही केवळ एक सामाजिक जबाबदारी नसून भविष्यासाठी केलेली गुंतवणूक आहे.यावेळी गावचे उपसरपंच बाळासाहेब राऊत ग्रामपंचायत सदस्य मसुराम राऊत,राहुल राऊत,रामेश्वर राऊत,

स्थानिक शाळेचे मुख्याध्यापक,तलाठी, मंडळ अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते व वनविभागाचे अधिकारी यांनी देखील या उपक्रमात मोलाची भूमिका बजावली. लागवडीनंतर या झाडांचे संगोपन व देखभाल यासाठी विशेष समितीची स्थापना करण्यात आली आहे.सदरील कार्यक्रमासाठी कानडीमाळी ग्रामपंचायत अधिकारी श्री.शंकर हेडगिरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## रूपाचा नाश होतो पण स्वरूपाचा नाही – ह.भ.प.बबन महाराज बहिरवाल

आष्टी (प्रतिनिधी)

पाण्यावर निर्माण होणारी लाट ही पाण्याचे रूप असते तर सोन्यापासून बनवलेले दागिने सोन्याचे रूप आणि माती पासून बनवलेले मडके हे मातीचे रूप असते. या सर्व रूपांचा नाश होतो परंतु पाणी पाण्याच्या सोने, सोन्याच्या तर माती मातीच्याच स्वरूपात राहते. म्हणजे रूपाचा नाश होतो पण स्वरूपाचा नाही तसे देहाचा जीवाचा म्हणजे शरीराचा नाश होतो परंतु शिवाचा नाही असे प्रतिपादन ह.भ. प. बबन महाराज बहिरवाल यांनी साबलखेड आयोजित कीर्तन सेवेप्रसंगी केले.

पुढे बोलतांना महाराज म्हणाले, माणसाकडे पद आले की मद निर्माण होतो जसे कि रावणाकडे प्रचंड संपत्ती होती, ज्यामध्ये सोन्या – चांदीचे अलंकार, रत्ने आणि विविध मौल्यवान वस्तूंचा समावेश होता. यामध्ये पाषाणाची घरे पाच लाख, विटेची घरे सात लाख, काशाची घरे एक कोटी तर तांब्याची आणि कांचनाची घरे सात कोटी होती. इतकी संपत्ती असून ही रावणाला मृत्यूच्या वेळी काहीही सोबत घेऊन जाता आले नाही. तात्पर्य एवढेच की, ज्या रावणाची एवढीसंपत्ती होती तो रावण मेल्यानंतर त्याच्या संपत्तीमधील एक कवडी देखील त्याच्या बरोबर घेऊन गेला नाही. तीच

परिस्थिती सिकंदराची देखील राहिली. संपत्ती वाल्याचा शेवट चांगला होत नाही, त्यामुळे मनुष्य जन्मामध्ये संपत्तीचे हाव न करता आपले कर्म चांगले करून आपल्या जीवनाचे सार्थक कसे होईल व आपल्या जीवनाचा शेवटचा दिस गोड कसा होईल हे सांगताना त्यांनी जगदुरु संत तुकाराम



महाराजांचा अभंग किर्तन सेवेसाठी घेतला होता.

आयुष्याचा शेवटचा दिवस गोड व्हावा यासाठीच माणसाचा सर्व खटाटोप आणि हट्ट असतो आणि शेवटचा दिवस म्हणजे जीव आणि शिव एकरूप होणे, शिव कोणी व्यक्ती नाही तर ती समस्त सृष्टी आहे. शिव आकाश तत्व आहे, चेतना आहे. असे त्यांनी यावेळी सांगीतले. यावेळी मा. आ. साहेबराव दरेकर, देविदास आबा धस, सतीश शिंदे, परमेश्वर शेळके, सुनील नाथ, दादासाहेब मुंडे, तानाजी बाप्पू जंजिरे, शंकर देशमुख, डॉ. पांडुरंग चौधरी, पांडू तात्या झिंजुर्के, निवृत्ती महाराज बोडखे, बबन महाराज मगर, भागचंद झांजे, पूजा पवार, अनिल ढोबळे, रवी ढोबळे, विक्रम पोकळे, अंकुश चव्हाण, शिवाजी नाकाडे, यशवंत खंडागळे, डॉ. उमेश गांधी, डॉ. शिवाजी शेंडगे तसेच पंचक्रोशीतील भाविक भक्त, भजनीमंडळ, महिला मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अमरसिंह पंडित यांच्या उपस्थितीत बंगाली पिंपळा येथील कार्यकर्ते राष्ट्रवादीत

गेवराई (प्रतिनिधी) शिवछत्र परिवार खरा गेवराई विधानसभा मतदारसंघातील जनतेसाठी सुख दु:खात धाऊन येतो, अमरसिंह पंडित आणि आ. विजयसिंह पंडित यांचे नेतृत्वच तालुक्याला पुढे घेऊन जाऊ शकते, तेव्हा त्यांना ताकद देण्याचा निर्धार करत बंगलीपिंपळा येथील शिवसेनेचे सक्रिय कार्यकर्ते तथा माजी सरपंच महादेव कारंडे, शालेय समितीचे अध्यक्ष रामदास ठोंबरे, उपसरपंच सोमेश्वर बरकडे यांनी अमरसिंह पंडित यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादीत जाहीर प्रवेश केला.



गेवराई विधानसभा मतदारसंघातील मौजे बंगलीपिंपळा येथील शिवसेनेचे सक्रिय कार्यकर्ते तथा माजी सरपंच महादेव कारंडे, शालेय समितीचे अध्यक्ष रामदास ठोंबरे, उपसरपंच सोमेश्वर बरकडे, शिवाजी कारंडे, नामदेव कारंडे, तुकाराम कारंडे, शिवाजी खताळ, सखाराम कारंडे, संजय कारंडे, अमोल कारंडे, अशोक कारंडे, राजेंद्र कारंडे, राजेंद्र नारायण कारंडे, अनंत कारंडे, योगेश कारंडे, गोविंद बरकडे, नामदेव गुलदगड, गणेश टकले, अप्पासाहेब बरकडे,राजेंद्र टकले, विलास गायकवाड, तुळशीराम टकले, अनिल काळे, सखाराम यमगर , बबन खताळ, महेश टकले, अशोक नामदेव कारंडे, ज्ञानेश्वर ठोंबरे, सोमनाथ ठोंबरे, सीताराम ठोंबरे, पप्पू बाबरे, अभिमान गुलदगड, सर्जेराव सजगणे, राजेंद्र टकले, दिलीप कारंडे, बाप्पा शिंगाडे, अनिल काळे, किशोर कारंडे, अशोक गरदे, बाळू गुलदगड, बळीराम बिचकुळे आदी शेकडो कार्यकर्त्यांनी माजी आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये बंगलीपिंपळा येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला.अमरसिंह पंडित यांनी सर्वांचे राष्ट्रवादी काँग्रेस मध्ये स्वागत करुन सर्वांनी एकत्र येऊन राष्ट्रवादी काँग्रेसचे विचार सामान्य जनतेत पोहोचविण्याचे आवाहन केले.

बंगाली पिंपळा येथे झालेल्या कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, बाजार समितीचे सभापती मुजीब पठाण, माजी जि.प.सदस्य फुलचंद बोरकर,

डॉ. विजयकुमार घाडगे, माजी पं.स. सदस्य परमेश्वर खरात, बाजार समितीचे संचालक जगन्नाथ काळे, राष्ट्रवादी विधानसभा क्षेत्र युवक अध्यक्ष गजानन काळे, शिवाजीराव गाडे, माजी चेअरमन सुधीर माने, माजी पं.स.सदस्य हिंमतराव खरात, बाजार समितीचे संचालक अशोक खरात, प्रा. संजय तळतकर, नवनाथ चौधरी, पवन चौधरी, दिनेश साळुंखे, बाळासाहेब तळेकर, तुकाराम भुईकर, अमोल नवले, किरण कदम सह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नायगावमध्ये ग्रामपंचायत वनिकिता फाउंडेशनचा संयुक्त विद्यमाने भव्य वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन ग्रामस्थांच्या उत्स्फूर्त सहभाग

पाटोदा (प्रतिनिधी)

एक घर 'एक वृक्ष,या घोषवाक्याला अनुसरून पाटोदा तालुक्यातील नायगाव ग्रामपंचायत व निकिता फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने नायगाव येथे भव्य वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात परिसराच्या पर्यावरण संवर्धनासाठी विविध प्रकारची झाडे लावण्यात आली. गावकऱ्यांचा मोठा सहभाग आणि महिलांचा विशेष पुढाकार यामुळे हा उपक्रम अत्यंत यशस्वी ठरला.या कार्यक्रमास नायगावच्या लोकप्रिय व कार्यक्षम सरपंच सौ.मंजुषा संजय कवठेकर यांनी मार्गदर्शन व सहभाग दिला. तसेच निकिता फाउंडेशनच्या अध्यक्षा कल्पना कवठेकर यांनी उपक्रमामागील प्रेरणा विषद केली आणि फाउंडेशनच्या सामाजिक बांधिलकीविषयी माहिती दिली.यावेळी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक वर्ग, ग्रामपंचायत सदस्य, तसेच गावातील बचत गटातील महिला, युवक मंडळे, ज्येष्ठ नागरिक व इतर प्रतिष्ठित ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या सहभागामुळे हा कार्यक्रम केवळ औपचारिकतेत मर्यादित न राहता, खऱ्या अर्थाने जनसहभागातून घडून आला.कार्यक्रमाआधी वृक्षारोपणाच्या महत्त्वावर प्रबोधनपर भाषणे आयोजित करण्यात आली. पर्यावरण संतुलन, जमिनीची धूप थांबवणे, पर्जन्यमान वाढवणे आणि भविष्यासाठी स्वच्छ व हरित गाव निर्माण करण्याचे उद्दिष्ट यामागे असल्याचे मान्यवरांनी स्पष्ट केले.नंतर गावातील शाळा परिसर, ग्रामपंचायत हद्द, रस्त्याच्या कडेला आणि इतर निवडक ठिकाणी अनेक प्रजातींची झाडे लावण्यात आली. या कार्यक्रमाला गावातील विविध स्वयंसहायता बचत गटातील महिलांनी वृक्षारोपणात हातभार लावला. त्यांनी वृक्षांची निगा राखण्याची जबाबदारीही स्वीकारली. हे कार्य महिलांच्या सामाजिक योगदानाचे उत्कृष्ट उदाहरण ठरले.ग्रामपंचायतीच्या पुढाकारामुळे आणि निकिता फाउंडेशनच्या सहकार्यामुळे नायगावमध्ये पर्यावरण पूरक उपक्रम राबवले जात आहेत. यामुळे गावाचा नैसर्गिक सौंदर्य वृद्धिंगत होत असून, भविष्यात 'हरित नायगाव' ही संकल्पना प्रत्यक्षात येईल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला.वृक्षारोपणानंतर झाडांचे संगोपन व संरक्षण हे पुढील महत्त्वाचे पाऊल असल्याने ग्रामपंचायतीमार्फत विशेष समिती



स्थापन करण्यात येणार असल्याचे सरपंच सौ. मंजुषा कवठेकर यांनी सांगितले. फाउंडेशनच्या मदतीने झाडांना नियमित पाणीपुरवठा, गवत कापणी व संरक्षणासाठी स्थानिक युवकांच्या सहभागातून कार्यवाही होणार आहे.नायगाव ग्रामपंचायत व निकिता फाउंडेशन यांच्या संयुक्त प्रयत्नातून राबवण्यात आलेला वृक्षारोपण कार्यक्रम हा केवळ एक दिवसाचा उपक्रम नसून, भविष्यातील पिढ्यांसाठी हरित वारसा निर्माण करण्याचा दीर्घकालीन संकल्प आहे. जनसहभाग, महिला पुढाकार आणि सामाजिक संस्थेच्या सहकार्याचा आदर्श उदाहरण ठरलेला हा उपक्रम इतर गावांसाठी प्रेरणादायक ठरेल, अशी भावना गावकऱ्यांनी व्यक्त केली.

# उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांच्याकडून बीड शहरातील विविध विकास कामांची पाहणी

## बीड शहराच्या वैभवात भर घालणारे कामे करा -अजित पवार







बीड /प्रतिनिधी

बीड शहरात सुरू असलेली विविध विकास कामे करताना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून दर्जेदार काम करावी. बीडकरांच्या स्मरणात राहील तसेच शहराच्या वैभवात भर घालणारे काम करावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी दिले.

उपमुख्यमंत्री श्री.पवार यांनी आज सकाळी बीड शहरातील चंपावती क्रीडा मंडळ, कंकालेश्वर मंदिर, जिल्हा रुग्णालय, येथे सुरू असलेल्या व नव्याने सुरू करण्यात येणाऱ्या विकास कामांची पाहणी केली. यावेळी आमदार विक्रम काळे, आमदार विजयसिंह पंडीत, माजी आमदार अमरसिंह पंडीत, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.राजेश देशमुख, आदिवासी विकास विभागाचे सचिव तथा जिल्ह्याचे पालक सचिव विजय वाघमारे, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण आदी उपस्थित होते.

कंकालेश्वर मंदिर येथे पाहणी करताना उपमुख्यमंत्री श्री.पवार यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून कामांची माहिती घेतली.

कंकालेश्वर देवस्थान हे बीड शहरासह जिल्ह्यातील भाविकांचे श्रद्धास्थान आहे. कंकालेश्वर देवस्थान परिसरात नव्याने सुरू करण्यात येणाऱ्या विकास कामांमध्ये पारंपरिक व आधुनिकतेचा संगम साधत बीडकरांना कायम स्मरणात राहील असे दर्जेदार कामे करावी. विकास काम करताना ती कामे गुणवत्तापूर्ण, दर्जेदार व टिकाऊ आणि वेळेत पूर्ण होईल याकडे लक्ष द्यावे. भाविकांना सर्व सोयीसुविधा मिळतील अशा सर्व बाबींचा आराखड्यामध्ये समावेश करावा, अशा सूचना उपमुख्यमंत्री श्री.पवार यांनी दिल्या. श्री. पवार यांनी यावेळी कंकालेश्वर मंदिरात दर्शन घेतले.जिल्हा क्रीडा संकुलाची पाहणी करून उपस्थित नागरिकांशी उपमुख्यमंत्री श्री.पवार यांनी संवाद साधला. जिल्हा क्रीडा संकुलासाठी २४९९.९६ लक्ष किंमतीच्या अंदाजपत्रकात विशेष बाब म्हणून सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. याबाबतचा शासन निर्णयही निर्गमित करण्यात आला आहे. क्रीडा संकुलाच्या कामामुळे बीडकर नागरिकांना सुसज्ज क्रीडा संकुल उपलब्ध होणार आहे. यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, क्रीडा संकुलालगत असलेला संपूर्ण परिसर स्वच्छ करावा, या परिसरात कुठेही कचरा दिसणार नाही याबाबत नगरपालिका प्रशासनाने दक्षता घ्यावी, असे निर्देश त्यांनी दिले.

## पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी झाडांची पाने - फुले यांच्या पासुन बनवल्या राख्या



बदनापुर / प्रतिनिधी

बदनापूर येथील शिक्षणासोबत संस्कार देणारी व नेहमीच नाविन्यपूर्ण उपक्रम राबवणारी अशी ओळख असलेली देवगिरी प्रतिष्ठान संचलित गुरुकुलम् शिशु वाटिका या शाळेने एक नाविन्यपूर्ण असा उपक्रम राबविण्याचा एक अनोखा प्रयत्न केला आहे तो प्रयत्न म्हणजे प्रत्येक शाळेमध्ये रक्षाबंधनासाठी विद्यार्थ्यांना राख्या ह्या घरून येताना सांगतात पण या शाळेने असं न करता शाळेमध्ये राख्या कशा बनवायच्या ते शिकवलं आणि अनोखी गोष्ट म्हणजे झाडाच्या पाने - फुले या पासुन कश्या राख्या बनवायच्या हे शाळेमध्ये विद्यार्थ्यांना शिकवण्यात आले राख्या बनवून दाखवल्या मुळे विद्यार्थ्यांना नवीन शिकायला भेटले आणि दुकानामधून राखी खरेदी करण्याची गरज पडली नाही यामुळे विद्यार्थ्यांचे पैसे सुद्धा वाचले आणि आपण ज्या राख्या विकत घेतो त्या मध्ये प्लास्टिक , पन्नी , यांसारख्या साहित्य पासून राखी बनवतात . टाकाऊला कलाटणी पर्यावरणाला साथ अस म्हणत गुरुकुलम शिष्यवटिकेचा हाच प्रयत्न आहे की निसर्गाशी समतोल राखण्यासाठी प्लॅस्टिक मुक्त परिसर करण्यासाठी ह्या शाळेचा एक छोटासा प्रयत्न आहे

कचरा नाही कला आहे*

आम्ही आमच्या गुरुकुलम् शिशुवाटिकेमध्ये नेहमीच विद्यार्थ्यांना सांगत असतो की निसर्ग आहे म्हणून आपण आहोत झाडांची पाने फुले यांपासून आम्ही मुलांना राखी कशी बनवायची हे शिकवले यामुळे विद्यार्थ्यांचे निसर्गासोबत एक अतूट असे नाते तयार झाले आणि विद्यार्थ्यांना नवीन शिकायला भेटले , व विद्यार्थ्यांना दुकानामधून राखी खरेदी करण्याची गरज पडली नाही यामुळे विद्यार्थ्यांचे पैसे सुद्धा वाचले . यावर एकच म्हणावसे वाटते की कचरा नाही , कला आहे ,

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौकातील हायमास्ट लाईटचे लोकार्पण



जाफ्राबाद / प्रतिनिधी

जाफराबाद येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौकातील हायमास्ट लाईटचे १ ऑगस्ट रोजी आमदार संतोष पाटील दानवे यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले.

अण्णाभाऊ साठे चौकात हायमास्ट लाईट उपलब्ध करून दिल्याबद्दल लहुजी शक्ती सेनेच्या वतीने आ. संतोष पाटील दानवे यांचे यावेळी आभार व्यक्त करण्यात आले.

साहित्यसम्राट, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती १ ऑगस्ट रोजी उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी आमदार संतोष पाटील दानवे यांच्या हस्ते अण्णाभाऊ साठे चौकात लावण्यात आलेल्या हायमास्ट लाईटचे लोकार्पण करण्यात आले. यांच्या मा.आ.संतोष पा.दानवे साहेबांचे आभार मानले. लहुजी शक्ती सेना ता. अध्यक्ष अमोल दांडगे यावेळी जाफ्राबादच्या तहसीलदार सारिका भगत, पोलीस

निरीक्षक जाधव साहेब, विजयसिह परिहार, नगर सेवक सुरेश दिवटे, गजानन गोफने, दिलीप खंदारे, राजू निकाळजे ड.सुनील सगट आदीसह लहुजी सेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.




## मंडळाधिकारी एस.टी.गारोळे यांची बीड येथे नायब तहसीलदारपदी नियुक्ती

जाफराबाद /प्रतिनिधी

जाफराबाद तहसील कार्यालयातील व माहोरा मंडळाचे मंडळाधिकारी म्हणून कार्यरत असलेले एस .टी गारोळे यांची बीड जिल्ह्यातील वडवणी तालुका तहसिल कार्यालयात नायब तहसीलदार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल त्यांचे तहसीलदार डॉ. सारिका भगत यांनी त्यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचा अभिनंदन केले.

याआधी ते घनसावंगी येथे बारा वर्षे व अंबड येथे बारा वर्षे तलाठी म्हणून कारभार पाहिला त्यानंतर ते भोकरदन येथे सात वर्ष व जाफराबाद येथे चार वर्ष मंडळाधिकारी म्हणून त्यांनी काम बघितले कर्तव्यावर असताना त्यांची काम करण्याची पद्धत व अनुभव याची दखल घेऊन सीनियरटी प्रमाणे शासनाने त्यांची बीड जिल्ह्यातील वडवणी तहसील कार्यालयात नायब तहसीलदार म्हणून नियुक्ती केली आहे.त्यांच्या निवडीबद्दल मंडळाधिकारी व्ही. आर. इंगोल मंडळाधिकारी पुष्पा सानप, संतोष कपुर,लहाने,तलाठी संघटनेचे तालुकाध्यक्ष अण्णा कड, भिमराज ब्राम्हणे,ए .एस. सोनवणे,जी. डब्ल्यु . भालके, अमोल मुरकुटे, यळवते, गावंडे,यांच्यासह महसूलच्या सर्व कर्मचाऱ्यांनी त्यांच्या अभिनंदन केले आहे.




## श्री वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखडा आता २८६ कोटींवरून होणार ३५१ कोटींचा..!

बीड /प्रतिनिधी

पाचवे ज्योतिर्लिंग असलेल्या श्री वैद्यनाथ प्रभूंच्या मंदिर व परिसराच्या विकास कामांचा आज राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय येथे आढावा घेण्यात आला. यावेळी विकास आराखड्याच्या माध्यमातून सध्या सुरू असलेल्या व नव्याने हाती घेण्यात येणाऱ्या विकास कामांचे सादरीकरण करण्यात आले. मंदिर व परिसराचा विकास करताना पौराणिक महत्त्व अबाधित राखून अभूतपूर्व विकास कार्य करण्यात यावे, अशा सूचना अजित दादांनी सर्व संबंधितांना दिल्या.

वाहनतळ, मेरुगिरी पर्वत परिसरातील कामे, दर्शन मंडप, नंदी, शिव प्रतिमा, उद्यान, प्रवेशद्वारे यांसह लागणाऱ्या अधिकच्या जमीन अधिग्रहण करण्याची जबाबदारी यावेळी धनंजय मुंडे यांनी घेतली आहे. यावेळी धनंजय मुंडे यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण मांडणी करत आराखडा कामातील बारकावे सर्वांच्या लक्षात आणून दिले.वाढीव जागेसह विविध कामांच्या पूर्ततेसाठी वाढीव निधीची तरतूद करण्याबाबत विनंती करताच अजित दादांनी ती मान्य केली असून, आता आराखडा २६८.६८ कोटिंवरून ३५१ कोटी इतका वाढवण्यास मान्यता दिली असून, या कामाला गती व निधी मंजूर करता यावा यासाठी हे काम नियोजन विभागाकडे वर्ग करण्यासही अजित दादा पवार यांनी मान्यता दिली आहे. यावेळी धनंजय मुंडे यांनी अजित दादा पवार यांचे सर्व परळीकर व शिव भक्तांच्या वतीने आभार मानले, बैठकीस आ. विक्रम काळे, आ. नमिता मुंदडा, सचिव राजेश देशमुख, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, पालक सचिव श्री. वाघमारे, आर्किटेक्ट हेमंत पाटील, परळी नगर पालिकेचे मुख्याधिकारी त्र्यंबक कांबळे, श्री. बेंडले, श्री. ढवळे यांसह आदी उपस्थित होते.

## जालना पंचायत समिती गटविकास अधिकाऱ्याविरुद्ध भ्रष्टाचाराच्या गंभीर तक्रारी

जालना /प्रतिनिधी

जालना कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक आणि भाजपा किसान मोर्चाचे जालना जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर माऊली शेजूळ यांनी जालना पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संदीप पवार यांच्याविरुद्ध भ्रष्टाचार आणि गैरव्यवहाराच्या गंभीर तक्रारींबाबत विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे सखोल चौकशी आणि कठोर कारवाईची मागणी केली आहे.

या तक्रारींमुळे शासकीय योजनांच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, ग्रामीण भागातील नागरिकांचे आर्थिक आणि सामाजिक नुकसान होत आहे. ज्ञानेश्वरमाऊली शेजूळ यांनी आपल्या पत्रात नमूद केले की, रोजगार हमी योजने अंतर्गत स्मशानभूमी शेड, शाळेच्या कंपाउंड वॉल, गटार नाल्या, पानंद रस्ते आणि विहिरींच्या कामांसाठी मंजूर निधीपैकी १० टक्के रक्कम पवार कमिशन म्हणून घेतात. पानंद रस्त्याच्या प्रशासकीय मान्यतेसाठी प्रत्येक प्रस्तावाला ५०,००० रुपये आणि विहिरीच्या मंजुरीसाठी प्रति लाभार्थी ३०,००० रुपये लाच स्वरूपात आकारली जात असल्याचा जालना तालुक्यातील शेतकऱ्यांचा आरोप आहे. याशिवाय, पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर आवास योजना, प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना, शबरी आवास योजना आणि वसंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनांच्या लाभार्थ्यांकडून प्रति लाभार्थी १०,००० रुपये लाच घेतली जात असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. यामुळे गरीब आणि गरजू लाभार्थ्यांचे शोषण होत असून, शासकीय योजनांचा मूळ उद्देश डावलला जात आहे. ज्ञानेश्वर शेजुळ यांनी सांगितले की, जालना तालुक्यातील अनेक लाभार्थी आणि गावकऱ्यांनी पवार यांच्या भ्रष्टाचाराबाबत लेखी आणि तोंडी तक्रारी केल्या आहेत. या तक्रारींमधून पवार यांनी पंचायत समितीच्या अधिकारांचा गैरवापर करून संगनमताने भ्रष्टाचार केल्याचे स्पष्ट होते. यामुळे ग्रामीण विकासकामांवर विपरीत परिणाम झाला असून, शासकीय निधीचा दुरुपयोग झाला आहे. ज्ञानेश्वर शेजुळ यांनी विभागीय आयुक्तांना या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन त्वरित कारवाई करण्याची विनंती केली आहे. याबाबतची प्रतिलिपी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, जिल्हाधिकारी जालना आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जालना यांना पाठवण्यात आली आहे. याप्रकरणी रोजगार हमी योजना आणि आवास योजनांच्या निधी वितरण, मंजुरी प्रक्रिया आणि अंमलबजावणीची खातेनिहाय चौकशी, दोषी आढळल्यास पवार यांचे तात्काळ निलंबन आणि भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा, १९८८ अंतर्गत कायदेशीर कारवाई, तसेच शोषित लाभार्थ्यांना न्याय आणि नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी ज्ञानेश्वर माऊली शेजूळ यांनी केली आहे. तसेच, जालना पंचायत समितीच्या कामकाजात पारदर्शकता आणि जबाबदारी सुनिश्चित करणारी यंत्रणा लागू करण्याची विनंतीही त्यांनी केली आहे.

जालना पंचायत समितीचे गटविकास अधिकारी प्रत्येक लाभार्थ्याकडून १० हजार रुपये लाच मागत असल्याच्या निषेधार्थ निवेदन

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आवास योजनेचे शेकडो लाभार्थी उद्या जालना पंचायत समितीचे गटविकास अधिकारी प्रत्येक लाभार्थ्याकडून १० हजार रुपये लाच मागत असल्याच्या निषेधार्थ निवेदन देणार आहेत. या लाभार्थ्यांना पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संदीप पवार यांच्याकडून आणि त्यांनी पाळलेल्या एजंट कडुन किंवा गुंडाकडून तसेच पोलिसांकडून मारहान होण्याची दाट शक्यता असल्याने धनगर समाजातील

# ऊसतोड कामगाराच्या कल्याणासाठी शासन कटिबद्ध - पालकमंत्री अजित पवार

## मेळाव्यास ऊसतोड कामगारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद






बीड /प्रतिनिधी

बीड जिल्ह्याची ओळख ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणून आहे.परंतु ऊसतोड कामगारांसाठी विविध कल्याणकारी अशा योजना आहेत. ऊसतोड कामगारांचे जीवन सुखकर होऊन त्यांच्या जीवनात स्थिरता, सुरक्षितता निर्माण करण्यासाठी गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाची स्थापन करण्यात आलेली आहे. या महामंडळाच्या माध्यमातूनही विविध योजना राबविण्यात येतात. त्याचा लाभ सर्व कामगारापर्यंत पोहोचविण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याची ग्वाही राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी दिली.

जिल्हा परिषद व सामाजिक न्याय विभागाच्यावतीने छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे जिल्ह्यातील ऊसतोड कामगार आरोग्य तपासणी शिबिराचे उद्घाटन व मिशन साथी उपक्रमाचा शुभारंभ श्री. पवार यांच्या हस्ते झाला. यावेळी सर्वश्री आमदार सतीश चव्हाण, विक्रम काळे, प्रकाश सोळंके, सुरेश धस, धनंजय मुंडे, संदीप क्षीरसागर, विजयसिंह पंडित, नमिता मुंदडा, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.राजेश देशमुख, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान आदींसह जिल्हा परिषदेतील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. पालकमंत्री श्री. पवार म्हणाले, कष्टकरी ऊसतोड कामगार स्वाभिमानी आहे. त्यांना विकासाच्या प्रवाहात आणण्याचे काम शासन करत आहे. बीडमध्ये ऊसतोड कामगाराचे अनेक प्रश्न, समस्या आहेत. त्या दूर करण्यासाठी शासन सदैव त्यांच्या पाठिशी आहे. त्यांच्या प्रत्येक पाल्याला उत्तम शिक्षण मिळावा यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. ऊसतोड कामगारांच्या पाल्यांनी नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्याची गरज आहे. ऊसतोड कामगारांसाठी अनेक योजना आहेत. त्यांचा लाभ सर्वांनी घ्यावा, यामध्ये सदस्यांना ओळखपत्र देण्यात येते. केवळ २० रूपयांमध्ये अर्ज करता येतो. संत भगवान बाबा वसतिगृह योजनेंतर्गत २२ वसतिगृह राज्यात मंजूर करण्यात आली आहेत, त्यापैकी १६ वसतिगृह सुरू आहेत. या वसतिगृहांना आर्थिक मदत देण्यासही शासन सकारात्मक आहे. ऊसतोड कामगारांची पुढची पिढी ऊसतोड कामगार राहणार नाही, याची काळजी घेऊन त्यांना विकासाच्या प्रवाहात आणण्यात येईल, असेही श्री. पवार म्हणाले. आजच्या नवतंत्रज्ञानाच्या काळात साधनेही आधुनिक स्वरूपात बाजारात उपलब्ध झालेली आहेत. यांत्रिकीकरण वाढत आहे, त्यामुळे सर्वांना काळानुरूप बदलावे लागेल, असेही ते म्हणाले. शासनाने सीट्रीपलआयटीच्या माध्यमातून याठिकाणी कुशल मनुष्यबळ निर्माण व्हावे, यासाठी मदत होणार आहे. या केंद्रातून आगामी काही वर्षात दरवर्षी ७००० कुशल विद्यार्थी निर्माण होण्यास मदत होणार आहे. जिल्ह्यातील कौशल्यवर्धक तंत्रशिक्षण व व्यावसायाभिमूख रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्याच्या दृष्टी सीट्रीपलआयटी प्रकल्प बीड जिल्ह्यात निर्माण करण्यात येत आहे. बीड जिल्ह्याच्या विकासासाठी सर्वांनी पुढकार घ्यावा शासन निधी देईल, तो सत्कारणी लावावा, असेही ते म्हणाले. बीड-अहिल्यानगर-मुंबई रेल्वे लवकरच सुरू करण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे. यासह बीड शहराजवळ किफायतशीर स्वरूपात विमानतळ असावे, यासाठीही प्रयत्न करण्यात येणार असल्याचे ते म्हणाले. कार्यक्रमात प्रातिनिधिक स्वरूपात आरोग्य साथी महिलांना फर्स्ट एड किटचे (प्रथमोपचार पेटी) वाटप करण्यात आले. ऊसतोड कामगारांसाठी उपयुक्त माहिती पुस्तिकेचे विमोचन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने 'बाल विवाह प्रतिबंधक' प्रतिज्ञेने समाजातील सकारात्मक बदल घडवण्याचा निर्धारही सर्वांनी यावेळी व्यक्त केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले. दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरूवात झाली. या कार्यक्रमात ग्रामीण गृहनिर्माण (घरकुल) चॅटबॉट सुविधेचा प्रारंभ करण्यात आला. मेळाव्यास उपस्थित सर्व महिलांना श्री.पवार यांनी रक्षाबंधनाच्या शुभेच्छाही

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बँक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# केडगावकरांचा आक्रोश! महानगरपालिकेचा परिसर घोषणाबाजीने दणाणला

अहिल्यानगर । प्रशांत बाफना
जिल्हा प्रतिनिधी

अहिल्यानगर महानगरपालिकेच्या केडगाव प्रभाग क्रमांक १७ मधील उपनगरीय भागातील नागरिकांनी अखेर महापालिकेवर हंडा मोर्चा काढत आपला संताप व्यक्त केला. गेल्या अनेक दिवसांपासून परिसरात सातत्याने पाणीटंचाई आणि अनियमित कचरा संकलनामुळे नागरिक त्रस्त झाले असून, यासंदर्भात प्रशासनाला यापूव निवेदन देऊनही कोणतीही ठोस कारवाई झाली नव्हती. त्यामुळे आज महिलांनी हातात पाणीभांडी घेऊन थेट पालिकेवर मोर्चा नेला.

मोर्चा आल्यानंतर महापालिकेच्या प्रवेशद्वारावर महिलांनी ठिय्या देत जोरदार घोषणाबाजी केली. पाणी आमचा हक्क आहे, महापालिका झोपलीय, कचऱ्याचा नाय नाय! अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. आंदोलनाला मोठा प्रतिसाद मिळाला आणि महिलांचा सहभाग विशेषत्वाने लक्षणीय होता. यावेळी माजी नगरसेविका लताताई शेळके, किरण धुर्वे, अक्षय आरडे, बापू कोतकर, प्रमोद आबूज, युवराज दळवी, मनोहर बगळे, राजू हुलगे, सचिन कोतकर, गणेश कोतकर, गोरख हुलगे, विशाल ठुबे, दीपक भाबरकर, परमेश्वर ओटी आदींसह अन्य नागरिक उपस्थित होते.

या मोर्चाचे नेतृत्व सामाजिक कार्यकर्ते महेश सरोदे आणि श्री गुरुदेव दत्त सेवा ट्रस्टने केले. सरोदे यांनी सांगितले की, महिनोंमहिने सहन करून आम्ही शांततेच्या मार्गाने निवेदन दिले, वेळ दिला, पण प्रशासनाने केवळ आश्वासनं देण्यापलीकडे काहीच केलं नाही. आम्हाला सहा ते आठ दिवसांनी पाणी मिळतं आणि तेही इतक्या कमी दाबाने की पाण्याचा उपयोग होण्याआधीच ते संपते. दुसरीकडे कचरा संकलनाची स्थिती अजून बिकट आहे. १०-१५ दिवसांनी कचरागाडी येते. रस्त्यावर कुजणाऱ्या कचऱ्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. आमचं घरं शुद्ध ठेवायचं, मुलांना रोगराईपासून वाचवायचं, पण प्रशासन काहीही करत नाही. यामुळेच आम्ही आज महिलांसह रस्त्यावर उतरलो आहोत.



महापालिकेचे अधिकारी एसी ऑफिसमध्ये बसून निर्णय घेतात, पण आम्हाला रोज सकाळी एक एक थेंब पाण्यासाठी धावपळ करावी लागते. स्वच्छता मोहिमा फक्त कागदावर चालतात, प्रत्यक्षात गल्लीबोळांत दुर्गंधी आणि साचलेला कचरा यामुळे जीवन असह्य झाले आहे, असेही सरोदे म्हणाले. पालिकेच्या प्रतिनिधींनी मोर्चेकऱ्यांशी चर्चा केली. पालिकेच्या वतीने सांगण्यात आले की, कचरा संकलनाचे टेंडर अद्याप प्रक्रियेत असल्याने त्यात थोडा वेळ लागणार आहे. मात्र, पाणीपुरवठ्याची समस्या तात्काळ सोडवली जाईल, असा शब्द देण्यात आला. मात्र आंदोलक नागरिकांनी फक्त आश्वासन नव्हे, तर कृती हवी असल्याचा ठाम पवित्रा घेतला. यावेळी अनिता दाते, सोनाली बोरुडे, सविता हुलगे, आरती सरोदे, अलका कोतकर, सीमा हुलगे यांसह अनेक महिला ठामपणे उभ्या होत्या.

केडगावकरांना माजी महापौर संदीप कोतकर यांची आठवण

माजी महापौर संदीप कोतकर यांच्या कार्यकाळात केडगावच्या नागरिकांना पाणीटंचाई आणि घनकचरा व्यवस्थापनाच्या समस्यांपासून मुक्ती मिळाली होती. परंतु, आता पुन्हा एकदा केडगावच्या नागरिकांना पाणी आणि कचऱ्याच्या समस्यांशी झुंजावे लागत आहे, ही खरोखरच मोठी शोकांतिका आहे. सामाजिक कार्यकर्ते महेश सरोदे यांनी पालिका प्रशासनाकडे केलेल्या मागण्यांचा प्रशासनाने गांभीर्याने विचार करावा. अन्यथा, यापुढे उद्भवणाऱ्या नागरिकांच्या रोषाला महापालिका प्रशासनास सामोरे जावे लागेल असा इशारा केडगाव ग्रामस्थांनी दिला आहे

# आडतेबाजारातील 'ती' कारवाई थांबवा; पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्याकडे मागणी

अहिल्यानगर । प्रशांत बाफना
जिल्हा प्रतिनिधी

शहरातील आडते बाजार, दाळमंडई, तेलीखुंट, जुना दाणे डबरा, वंजार गल्ली, तपकीर गल्ली, गंजबाजार या भागात माल देण्यासाठी व घेण्यासाठी आलेल्या टेम्पो व इतर वाहनांवर पोलिसांकडून वारंवार ऑनलाईन दंडात्मक कारवाई केली जात आहे. त्यामुळे वाहनचालकांचे अतोनात नुकसान होत असून ते बाजारपेठेत येण्यास नकार देऊ लागले आहेत. त्यामुळे पोलिसांना ऑनलाईन दंड करण्याची कारवाई त्वरित थांबवण्यासाठी योग्य तो आदेश द्यावेत. बाजारपेठेतील वाहनांना थेट दंड न आकारता पोलिसांनी वाहतूक सुरळीत कशी करता येईल याकडे लक्ष देऊन वाहन चालकाला व व्यापाऱ्यांना सहकार्य करावे. तसेच मंगलगेट पोलीस चौकी त्वरित सुरू करून चोऱ्यांना आळा घालावा, आदी मागण्यांचे निवेदन आडते बाजार व्यापारी असोसिएशनच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांना देण्यात आले.



यावेळी आमदार संग्राम जगताप, आडते बाजार व्यापारी असोसिएशनचे संस्थेचे उपध्यक्ष गोपाल मणियार, सचिव संतोष बोरा, मार्केट कमिटी संचालक राजेंद्र बोथरा, राजेश गुगळे, सचिव विश्वनाथ कासट, अशोक भंडारी, सल्लागार रमेश सोनीमंडलेचा, मिलिंद जांगडा, संजय लोढा, माजी नगरसेवक विपुल शेटिया व अन्य व्यापारी उपस्थित होते.यावेळी देण्यात आलेल्या निवेदनात नमूद केले आहे की,अहिल्यानगर मधील बाजारपेठ राज्यातील मोठी बाजारपेठ म्हणून प्रसिद्ध आहे. या बाजारपेठांमध्ये नगरसह आजूबाजूच्या अन्य जिल्ह्यांतील दुकानदार व व्यापारी माल खरेदी विक्रीसाठी येत असतात.

त्यामुळे साहजिकच बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात माल वाहतुकीसाठी तीन-चार चाकी छोटे, मोठे टेम्पो येत असतात. त्यामुळे बाजारपेठेत वाहतुकीची कोंडी होते.या बाजारपेठेत ठराविक वेळेतच पोलीस अधूनमधून उभ्या असलेल्या मालवाहतुकदारांच्या वाहनाचा फोटो काढून ऑनलाईन दंड करत आहेत. हे प्रकार गेल्या दोन महिन्यांपासून चालू आहेत. त्यामुळे मालवाहतूक टेम्पो, वाहनचालक कोणताही माल घेण्यासाठी व देण्यासाठी बाजारपेठेत येण्यास तयार नाही. याचा बाजारपेठेवर खूप मोठा व्यवसायिक परिणाम होऊन बाजारपेठ बंद पडण्याची वेळ आली आहे. त्यामुळे व्यापाऱ्यांवर खूप मोठा अन्याय होत आहे. बाजारपेठेतील वाहन चालकाला विनाकारण दंड भरावा लागत असल्याने त्याचा व्यवसाय बंद पडत आहे, असेही निवेदनात म्हटले आहे.

गस्त वाढवावी, मंगलगेट पोलीस चौकी सुरू करा

पोलिसांनी ऑनलाईन दंड करण्याची कारवाई त्वरित थांबविण्यासाठी योग्य तो आदेश द्यावेत. बाजारपेठेत पोलिसांनी थेट दंड न आकारता वाहतुक सुरळीत कशी करता येईल याकडे लक्ष द्यावे. बाजारपेठेत मंगलगेट पोलीस चौकी आहे. अनेक वर्षांपासून ती बंद असते. तेथे पोलीस दिसत नाही. ही चौकी त्वरित चालू करून तेथे पोलीस कर्मचाऱ्यांची नेमणूक करावी. तसेच बाजारपेठांमध्ये पोलिसाची गस्त वाढवावी जेणेकरून बाजारपेठेतील चोऱ्यांना आळा बसेल, असेही निवेदनात म्हटले आहे.

# जिंतूर ग्रामीण रुग्णालयात साप आढळल्याने रुग्णांची तारांबळ

परभणी (प्रतिनिधी):

जिंतूर येथील ग्रामीण रुग्णालयात रुग्णांच्या व रुग्णांच्या नातेवाईकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. नुकत्याच घडलेल्या घटनेत रुग्णालयात साप आढळल्याने एकच खळबळ उडाली आहे. सर्पदंशाच्या भीतीने रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांनी रुग्णालयाच्या आवारातून पळ काढला.

रुग्णालयाच्या विमा कॅशलेस केंद्र व बाह्य रुग्ण विभागामध्ये एक विषारी साप आढळून आला. दरवर्षी या ठिकाणी पावसाळ्यात अशा प्रकारचे साप आढळण्याचे प्रकार घडत असून प्रशासन याकडे सातत्याने दुर्लक्ष करत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.रुग्णालयात साप आढळल्याची माहिती मिळताच कर्मचाऱ्यांनी तत्काळ सर्पमुक्ती केंद्राला पाचारण करून साप पकडण्याची प्रक्रिया पूर्ण केली.



मात्र, या घटनेमुळे रुग्णालयाच्या व्यवस्थापनाच्या हलगर्जीपणावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.नागरिकांनी रुग्णालयात स्वच्छता, सुरक्षा व योग्य देखभालीची मागणी केली आहे. तसेच, यापुढे अशा घटना घडू नयेत यासाठी तात्काळ उपाययोजना करण्यात याव्यात, अशी जोरदार मागणी होत आहे.

# राजे संभाजी मित्र मंडळाची माखनचोर दहीहंडी फोड स्पर्धा १८ ऑगस्ट रोजी

## अभिनेत्री अमृता खानविलकरांची उपस्थिती ठरणार विशेष आकर्षण

परभणी (प्रतिनिधी): शहरातील राजे संभाजी मित्र मंडळाच्यावतीने आयोजित माखनचोर दहीहंडी फोड स्पर्धा यंदा दि. १८ ऑगस्ट रोजी मोठ्या जल्लोषात पार पडणार असून यंदाचे हे २३ वे वर्ष आहे. सलग २२ वर्षे ही स्पर्धा यशस्वीरित्या पार पडत असून, यावर्षीचे मुख्य आकर्षण प्रसिद्ध मराठी अभिनेत्री अमृता खानविलकर असणार आहेत. त्यांच्या उपस्थितीमुळे स्पर्धेला विशेष रंगत येणार असून, प्रेक्षकांमध्येही उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या भव्य स्पर्धेचा उद्घाटन सोहळा खासदार संजय जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. स्पर्धा परभणीतील महात्मा फुले विद्यालयाच्या मैदानावर पार पडणार असून, यासाठी सर्व आवश्यक तयारी करण्यात आली आहे. दहीहंडी फोडण्यासाठी विविध नामवंत गोविंदा पथकांनी तयारी सुरू केली आहे. स्पर्धेचे परीक्षण प्रशिक्षित पंच करणार असून, महिलांसाठी स्वतंत्र बसण्याची आणि सुरक्षिततेची विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे बक्षीस १ लाख ११ हजार १११ रुपये रोख ठेवण्यात आले आहे. द्वितीय क्रमांकासाठी ७१ हजार रुपये तर तृतीय क्रमांकासाठी ५१ हजार रुपयांचे रोख बक्षीस दिले जाणार आहे. याशिवाय दोन उत्तेजनार्थ बक्षिसांचीही घोषणा आयोजक मंडळाकडून करण्यात आली आहे. या स्पर्धेचा उद्देश सामाजिक एकोपा, उत्सवप्रियता आणि परंपरेचा गौरव राखणे असा असून, दरवर्षीप्रमाणे यंदाही ही स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडणार आहे. परभणीकरांनी मोठ्या संख्येने या स्पर्धेला उपस्थित राहून दहीहंडीचा थरार अनुभवावा आणि अमृता खानविलकर यांची झलक पाहण्याची संधी सोडू नये, असे आवाहन राजे संभाजी मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष आणि खासदार संजय जाधव यांनी केले आहे.



# बाबुलतारा (ता. परतूर) येथील शेतकरी आत्महत्या: 'आधारवड फाऊंडेशन'कडून मदतीचा हात

डॉ आशिष तिवारी/मंठा

बाबुलतारा (ता परतूर) येथील युवक शेतकरी राजेभाऊ देविदास काळे (वय ३५) यांनी २ जुलै रोजी राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. त्यांच्या पश्चात पत्नी, एक लहान मुलगा, एक मुलगी आणि वृद्ध आई-वडील असा परिवार असून कुटुंबावर मोठा आर्थिक डोंगर कोसळला आहे. कुटुंबाकडे फक्त एक एकर शेती आहे आणि वडील व्यसनाच्या आहारी गेल्यामुळे उत्पन्नाचे सर्व मार्ग बंद झाले होते. त्यातच बँकेचे कर्ज फेडणे अशक्य झाल्यामुळे आलेल्या मानसिक तणावातून त्यांनी टोकाचे पाऊल उचलले.

या दुर्दैवी घटनेबाबत भारतराव पंडीत आणि दीपक रामचंद्र काळे यांनी माहिती दिल्यानंतर, 'आधारवड फाऊंडेशन' परतूरच्या वतीने अध्यक्ष श्याम वाढेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सचिन चव्हाण आणि शिवाजी हिवाळे यांनी पीडित कुटुंबाची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांना रु. १०,०००/- चा धनादेश व मुलांच्या शैक्षणिक साहित्याचे वाटप केले.या दोन्ही मुलांच्या पुढील शिक्षणासाठी त्यांना 'आधारवड फाऊंडेशन' तर्फे दत्तक घेण्यात आले आहे, अशी माहिती अध्यक्ष श्याम वाढेकर यांनी दिली.त्यांनी पुढे बोलताना सांगितले की, अनेकांच्या आयुष्यात अडचणी असतात, पण आत्महत्या हा कधीच पर्याय होऊ शकत नाही. संकटांशी सामना करा, आपल्या कुटुंबाला उघड्यावर टाकू नका. व्यसनांपासून नेहमी दूर राहा.



# परभणीत अभाविपच्या सदस्यता अभियानाला सुरुवात

१०००० सदस्यता नोंदणी करण्याचे उद्दिष्ट पूर्ण करणार..

परभणी (प्रतिनिधी):श्री शिवाजी महाविद्यालय समोर या नोंदणी अभियानाची सुरुवात करण्यात आली यावेळी प्रदर्शनी उद्घाटन अभाविप देवगिरी प्रदेशमंत्री वैभवी ढिवरे, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे राज्यपाल नियुक्त अधिसभा सदस्य श्री अशोक गुजराती, पूर्व महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष प्रा. डॉ. ज्ञानोबा मुंडे, परभणी शहरमंत्री सेजल काळे यांच्या हस्ते उद्घाटन करून सुरुवात करण्यात आली.

या प्रदर्शनीच्या माध्यमातून वर्षभरामध्ये केलेल्या कार्याची माहिती प्रदर्शनी द्वारे लावण्यात आली होती. यावेळी प्रदेश मंत्री वैभवी ढिवरे म्हणाल्या की अभाविप गेल्या ७७ वर्षांपासून शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात अविरतपणे कार्यरत आहे.विद्यार्थ्यांना शिक्षण घेत असताना येणाऱ्या विविध शैक्षणिक समस्या सोडवणे, त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता विविध कार्यक्रम उपक्रमांचे आयोजन करणे अभाविपचे ७७ वर्षापासूनचे कार्य आहे. विद्यार्थ्यांना या विविध कार्यक्रम उपक्रमांमध्ये सहभागी करून घेण्यासाठी त्याचबरोबर त्यांच्या शैक्षणिक समस्या जाणून घेण्यासाठी अभाविप दरवर्षी सदस्यता अभियान राबवत असते. हे सदस्यता अभियान ५ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट दरम्यान परभणी जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांमध्ये राबविण्यात येणार आहे.या सदस्यता अभियानातून विद्यार्थ्यांना समाजात काम करण्याची संधी आहे. परभणी जिल्ह्यातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सदस्यता करावी व राष्ट्रपुनर्निर्मानामध्ये मध्ये आपले योगदान द्यावे असे आवाहन अभाविप परभणी शहरमंत्री सेजल काळे यांनी केले आहे.




अधिसभा सदस्य श्री अशोक गुजराती यांनी या सदस्यता अभियानासाठी विद्यार्थी परिषदेच्या कार्यकर्त्यांना शुभेच्छा दिल्या.



# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका स्वबळावर लढविण्याचा शिवसेनेद्वारे निर्धार

पाथरीत उबाठा गटाच्या पदाधिकार्यांची बैठक

परभणी,दि.०७(प्रतिनिधी) : आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढविण्याचा ठाम निर्धार शिवसेना पदाधिकार्यांनी, कार्यकर्त्यांनी पाथरी येथे व्यक्त केला आहे.

पाथरी येथील शासकीय विश्रामगृहात गुरुवारी (दि.०७) शिवसेनेच्या प्रमुख पदाधिकार्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. खासदार संजय जाधव यांच्या आदेशानुसार, जिल्हाप्रमुख रवींद्र धर्मे व तालुकाप्रमुख मुंजाभाऊ कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली ही बैठक झाली. यावेळी शहरप्रमुख दीपक कटारे, माजी जिल्हा परिषद सदस्य रणजीत नाना गिराम, युवासेना तालुकाप्रमुख पांडुरंग शिंदे, पंचायत समिती सदस्य शरद कोल्हे, सदस्य ज्ञानेश्वर शिंदे, तालुका समन्वयक हरिभाऊ वाकणकर, उपतालुकाप्रमुख तुकाराम हरकळ, रावसाहेब निकम, सर्कलप्रमुख सत्यनारायण घाटूळ, देवनांद्रा सर्कलप्रमुख रमेश नायकल, अविराज टाकळकर, विजय नखाते, सुरेश नखाते, पप्पू रनेर, बालू कोल्हे, राधे गिराम, रणजित गायकवाड, राजेश मस्के, रोहन कदम, शिवराम धर्मे, तुकाराम लोखंडे, शिद्दू इंगळे यांच्यासह तालुक्यातील इतर अनेक पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका स्वबळावर लढण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. बैठकीत जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगरपालिका निवडणुका स्वबळावर लढण्यासंदर्भात शिवसैनिकांनी आपापल्या भावना मांडल्या. उपस्थित सर्व पदाधिकार्यांनी या भूमिकेचा पाठिंबा दिला. बैठकीच्या समारोपात जिल्हाप्रमुख धर्मे यांनी सांगितले की, सर्व शिवसैनिकांच्या भावना पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांपर्यंत पोहोचवल्या जातील आणि खासदार संजय जाधव यांच्याशी चर्चा करून अंतिम निर्णय घेतला जाईल.

# जिल्हा परिषदेच्या गलथान कारभारामुळे एनपीएस कर्मचाऱ्यांच्या पेन्शनवर परिणाम

## सहा महिन्यांपासून कपात केलेली रक्कम तिथेच पडून एनपीएसकडे रक्कम वर्ग करायला मुहूर्त हवाय का?

वडवणी (प्रतिनिधी)

महाराष्ट्र शासनाने तसेच केंद्र शासनाने सन २००५ नंतर शासकीय तसेच निमशासकीय सेवेत प्रविष्ट होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी एनपीएस म्हणजेच राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना अंमलात आणलेली आहे. या योजनेअंतर्गत पात्र कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतर मिळणारी पेन्शन ही त्यांच्या पगारीतून कपात केलेली रक्कम व शासनाने दिलेले अंशदान या दोन्ही रक्कमा शासनाने शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करुन मिळणाऱ्या परताव्यावर अवलंबून आहे. पण यात महत्त्वाची गोष्ट अशी की, जी रक्कम एनपीएस ट्रस्टकडे जावून शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक व्हायला पाहिजे तीच रक्कम जिल्हा परिषदेतील गलथान कारभारामुळे त्याठिकाणीच अडकून पडत आहे. मागील सहा महिन्यांपासून बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषद शिक्षकांची कपात केलेली एनपीएसची रक्कम तिथेच धुळखात पडून असून त्यामुळे एनपीएसकडे रक्कम वर्ग करायला जिल्हा परिषदेला एखादा मुहूर्त हवाय का? असाच प्रश्न निर्माण झाला आहे. यामुळे ही राष्ट्रीय पेन्शन योजना म्हणजे कर्मचाऱ्यांसाठी असून अडचण नसून खोळंबा अशीच काहीशी बनली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, सन २००५ नंतर शासकीय सेवेत नियुक्त होणाऱ्या शिक्षकांसह सर्व शासकीय कर्मचाऱ्यांसाठी केंद्र शासनाने तसेच महाराष्ट्र शासनाने एन.पी.एस. नॅशनल पेन्शन स्कीम म्हणजेच राष्ट्रीय निवृत्ती पेन्शन योजना ही योजना लागू केली आहे. जुन्या पेन्शनचे कसलेही लाभ या नविन पेन्शन योजनेअंतर्गत कर्मचाऱ्यांना मिळत नाहीत. ही पेन्शन योजना पूर्णपणे शेअर मार्केट मधील परताव्यावर अवलंबून आहे. शासन कर्मचाऱ्यांच्या पगारातून प्रत्येक महिन्याला ठराविक हिस्सा कापून घेते तसेच शासनही काही रक्कम अंशदान म्हणून या योजनेत जमा करते. ही एकत्रित जमा झालेली कपात रक्कम ही पगारीच्या आठ ते दहा दिवसांनंतर तातडीने त्याच महिन्यात जिल्हा परिषदेच्या वित्त विभागाकडून एनपीएस ट्रस्टकडे जाणे अपेक्षित व गरजेचे आहे. म्हणजे नंतर या एनपीएस ट्रस्टकडून त्या पैशांचे शेअर मार्केटमधील विविध कंपनींचे त्या त्यावेळी असणाऱ्या एनएव्हीनुसार युनिटस खरेदी केले जातात. आणि सेवानिवृत्तीनंतर हे युनिटस विकून येणारी रक्कम म्हणजेच कर्मचाऱ्याला मिळणारी पेन्शन आहे. परंतू यातील गंभीर बाब अशी की, जिल्हा परिषदेमधील वित्त विभागात काम करणाऱ्या कामचुकार कर्मचाऱ्यांकडून प्रत्येक महिन्याला एनपीएस ट्रस्टकडे




कर्मचाऱ्यांची कपात केलेली रक्कम व अंशदानाची रक्कम जायला पाहिजे ती कधीच जात नाही. व याचा थेट परिणाम शेवटी कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या पेन्शनवर होणार आहे. जिल्हा परिषद शिक्षकांची माहे फेब्रुवारी २०२५ पासून ते जुलै २०२५ या मागील ६ महिन्यांत कपात केलेली एनपीएस रक्कम अजूनही एनपीएस ट्रस्टकडे गेलेली नाही. शेअर मार्केटमध्ये नियमीत चढउतार होत असतात. फेब्रुवारी पेक्षा आता सध्या शेअर मार्केटचा इंडेक्स वाढलेला आहे. परिणामी फेब्रुवारीची कपात रक्कम जर जिल्हा परिषदेच्या दिरंगाईमुळे आता ऑगस्टमध्ये शेअर मार्केटमध्ये जात असेल अन आता शेअर मार्केट उच्च स्तरावर असल्यामुळे जर चढ्या भावाने युनिटस खरेदी करावे लागत असतील तर त्यामुळे यात कर्मचाऱ्यांचे वैयक्तिक आर्थिक नुकसान होणार आहे. व याचा प्रतिकूल दूरगामी परिणाम त्याला शेवटी मिळणाऱ्या पेन्शनवर शंभर टक्के होणार आहे. त्यामुळे जिल्हा परिषद शिक्षकांची एनपीएस ट्रस्टकडे जाणारी प्रत्येक महिन्याची रक्कम ही त्याचवेळी पगार झाल्यानंतर जास्तीत जास्त आठ दिवसांत एनपीएस ट्रस्टकडे जाणे अपेक्षित व अत्यंत गरजेचे आहे. याबाबत जिल्हा परिषदेमध्ये जावून संबंधित टेबलवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना विचारणा केली असता तिथे उडवा उडवीचे उत्तरे दिली जातात. आम्हाला काय एवढेच काम आहे का?, हे शासकीय काम आहे याला उशीर हा असतोच, तुम्हाला कोणाकडे तक्रार करायची ती करा आमचं कोणीच काही वाकडं करु शकत नाही अशी उत्तरे तेथून मिळतात. हे कोठेतरी थांबायला हवे. वास्तविक वित्त विभागात एनपीएस बाबत काम करणारे कर्मचारी हे जुन्या पेन्शनमध्ये असल्याकारणाने त्यांना नविन पेन्शन योजनेचे कसलेही सोयर सुतक नाही

# नागरी समस्या सोडविण्यासाठी निधी द्या : रुपेशराजे बेद्रेपाटील

सामान्य कार्यकर्त्याची मोठी मागणी, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा सकारात्मक प्रतिसाद

पाटोदा (प्रतिनिधी) पाटोदा तालुक्यातील डोंगरकिन्ही जिल्हा परिषद गटातील नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आणि विविध विकास कामांसाठी आवश्यक निधी मंजूर करण्यात यावा, अशी मागणी मराठवाडा रहिवासी संघाचे संस्थापक अध्यक्ष तसेच राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस रुपेशराजे बेद्रेपाटील यांनी उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

गुरुवारी (दि. ७) अजित पवार बीड दौऱ्यावर असताना शासकीय विश्रामगृहावर त्यांची भेट घेऊन बेद्रेपाटील यांनी सविस्तर निवेदन सादर केले. कोणतेही घटनात्मक पद नसतानाही सामान्य कार्यकर्ता म्हणून बेद्रेपाटील यांनी केलेल्या या सूचनांकडे उपमुख्यमंत्र्यांनी सकारात्मक दृष्टीने पाहत त्वरित प्रशासनाच्या माध्यमातून त्यावर कार्यवाहीचे संकेत दिले.

बेद्रेपाटील यांनी निवेदनात नमूद केले आहे की, बीड शहरात स्वच्छता मोहीम, आरोग्यसेवा आणि घंटागाडी सेवा नियमित ठेवण्यासाठी प्रशासनाने सक्रिय पावले उचलावीत. शहरात स्वच्छतागृहांचा अभाव असल्याने महिलांना तसेच शाळेतील विद्यार्थिनींना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे शहरातील सार्वजनिक ठिकाणी, विशेषतः बसस्थानक परिसरात, शौचालय सुविधा तसेच सॅनिटरी पॅड उपलब्धता तातडीने करण्यात यावी. तसेच, १० नोव्हेंबर १९९० रोजी स्थापन झालेल्या बीड आकाशवाणी केंद्राने आतापर्यंत उत्तम सेवा दिली असून अंदाजे वीस लाख श्रोते या केंद्राशी जोडलेले आहेत.



मात्र, या केंद्रात पूर्णवेळ प्रसारण व कार्यक्रम अधिकारी नाहीत. त्यामुळे केंद्राचे नियमित कार्यक्रम तातडीने सुरू करावेत, अशी विनंती त्यांनी निवेदनात व्यक्त केली आहे.

याशिवाय पाटोदा तालुक्यातील डोंगरकिन्ही जिल्हा परिषद गटात येणाऱ्या विविध ग्रामपंचायतींमध्ये रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य सुविधा यांसारख्या मूलभूत विकास कामांसाठी आवश्यक निधी त्वरीत उपलब्ध करून द्यावा, अशीही मागणी करण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बेद्रेपाटील यांचे निवेदन स्विकारत, नागरी सुविधा व विकासकामे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी असून संबंधित यंत्रणेला आवश्यक त्या सूचना दिल्या जातील, असा विश्वास व्यक्त केल्याचे रुपेषराजे बेद्रेपाटील यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

# बीड ते मुंबई रेल्वे सुरू करण्याची रेल्वे समितीची मागणी

बीड /प्रतिनिधी

अहिल्यानगर बीड परळी या रेल्वे मार्गाचे काम पूर्णत्वाकडे असून बीड पर्यंत काम पूर्ण झाले आहे तेव्हा बीड ते अहिल्यानगर व पुढे मुंबई ही रेल्वे सेवा सुरू करण्यात यावी या मागणीचे निवेदन उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित दादा पवार यांना स्वातंत्र सैनिक रेल्वे आंदोलन समितीच्या वतीने देण्यात आले.

स्वातंत्र्यसैनिक रेल्वे आंदोलन समितीच्या वतीने उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की बीड ते अहिल्यानगर रेल्वेचे काम पूर्ण झालेले असल्याने बीड ते मुंबई रेल्वे त्वरित सुरू करण्यात यावी तसेच बीड ते परळी रेल्वे मार्गाचे काम २०२५ पर्यंत पूर्ण करून ती पण रेल्वे परळी पासून मुंबई पर्यंत चालू करण्यात यावी धाराशिव बीड संभाजीनगर रेल्वेचे सर्वेक्षण झालेले आहेत त्यास मान्यता देऊन हा मार्गही लवकरात लवकर मार्गी लावावा हा रेल्वे मार्ग बीड जिल्ह्याच्या जनतेसाठी महत्त्वाचा असून आपल्यास मार्गदर्शनाखाली हे काम व्हावे अशी मागणी रेल्वे स्वातंत्र्यसैनिक रेल्वे आंदोलन समितीचे अध्यक्ष जवाहरलाल सारडा ज्येष्ठ सदस्य सत्यनारायणाची लाहोटी अशोक शेटे लाईक भाई शांतीलाल पटेल विष्णुदास बियाणे वाया जनार्दन राव सुरेश बुद्धदेव सुरेश नाना मेखे डॉक्टर अरुण भस्मे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

अजित दादा सकारात्मक

निवेदन स्वीकारल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सध्या बीड ते अहिल्यानगर ही रेल्वे मराठवाडा मुक्ती संग्राम दिन म्हणजेच १७ सप्टेंबर पर्यंत सुरू करण्याचा प्रयत्न राहील आणि पुढे मुंबईसाठी आपण प्रयत्न करू अशी आश्वासन स्वातंत्र्यसैनिक रेल्वे आंदोलन समितीला दिले

अहिल्यानगर बीड परळी या रेल्वे मार्गाचे काम पूर्णत्वाकडे असून बीड पर्यंत काम पूर्ण झाले आहे तेव्हा बीड ते अहिल्यानगर व पुढे मुंबई ही रेल्वे सेवा सुरू करण्यात यावी या मागणीचे निवेदन उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित दादा पवार यांना स्वातंत्र सैनिक रेल्वे आंदोलन समितीच्या वतीने देण्यात आले.



बीड - जिल्हा माहिती कार्यालयातील कर्मचारी एम आर चिखले (मुळे) यांचे वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन करताना दैनिक समर्थ राजयोगचे संपादक तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी.

# शिवसेनेच्या वरिष्ठ नेत्यांनी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांचे फुंकले रणशिंग! शिवसैनिकांनो, आम्ही पूर्ण ताकदीने तुमच्या पाठीशी मंत्री ना. उदय सामंत

## शिवसेना नेत्यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हा आढावा बैठक संपन्न



बीड, प्रतिनिधी -

स्थानिक स्वराज्य संस्थांवर शिवसेनेचा भगवा फडकविण्यासाठी कामाला लागा. तळागाळात जाऊन संघटना बांधणी करून पक्ष मजबूत करा. गरज पडेल तिथे आवाज द्या, अगदी शाखेच्या उदघाटनासाठी देखील आम्ही येऊ. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते एकनाथराव शिंदे साहेब आपल्यासोबत पूर्ण ताकदीने आहेत. असा विश्वास देत

महाराष्ट्र राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत साहेब यांनी बीड शिवसैनिकांमध्ये प्रचंड जोश निर्माण केला. काल दि. ७ ऑगस्ट २०२५ रोजी बीड शहरातील हॉ. ग्रँड यशोदा येथे दु २.३० वाजता महाराष्ट्र राज्य उद्योगमंत्री ना. उदयजी सामंत साहेब, शिवसेना सचिव संजयजी मोरे साहेब, शिवसेना सचिव भाऊसाहेबजी चौधरी साहेब, शिवसेना उप नेते माजी खा. राहुलजी शेवाळे साहेब, शिवसेना उपनेते अर्जुनजी खोतकर साहेब, मराठवाडा सचिव अशोकजी पटवर्धन साहेब, बीड जिल्हा संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे साहेब, जिल्हाप्रमुख अनिल जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर, महिला आघाडी संपर्क प्रमुख संगीताताई चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये बीड जिल्हा शिवसेना पदाधिकारी यांची आढावा बैठक पार पडली. या बैठकीत जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर यांच्याकडून बीड जिल्ह्याचा आढावा शिवसेना नेत्यांसमोर सादर करण्यात आला. यानंतर जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर पालिका निवडणुकांबाबत विचार विनिमय, ध्येय धोरण ठरविण्यात आले. तसेच शिवसेना नेत्यांनी सर्व पदाधिकाऱ्यांशी मुक्तसंवाद साधत सर्व समस्या जाणून घेत त्यांना आम्ही तुम्हाला ताकद देतो, तुम्ही संघटना मजबूत करा, सदस्य नोंदणीवर अधिक काम करा, स्थानिक स्वराज्य संस्थांवर भगवा फडकला पाहिजे. असा ठणठणीत आदेश मंत्री ना. उदय सामंत यांच्यासह शिवसेना नेत्यांनी पदाधिकाऱ्यांना देऊन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे रणशिंग फुंकले.

पक्षसंघटनेच्या कामात हलगर्जीपणा सहन करणार नाही- संजय मोरे

विधानसभा निवडणुकीच्या भरीव यशानंतर आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महत्वपूर्ण टप्पा असून पदाधिकाऱ्यांनी पक्ष संघटन मजबूत करण्याकरिता सदस्य नोंदणीवर अधिक काम करने गरजेचे आहे. पक्षसंघटनेच्या कामात किंचितही हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही असे शिवसेना सचिव संजय मोरे यांनी आढावा बैठकीत पदाधिकाऱ्यांना ठणकाउन



सांगितले.

एकनाथजी शिंदेसाहेब सामान्य कार्यकर्त्यांच्या कष्टांची जाणीव असणारे नेते- भाऊसाहेब चौधरी

महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते सन्माननीय एकनाथजी शिंदे साहेब सर्व सामान्य कार्यकर्त्यांच्या कष्टांची जाणीव ठेवणारा नेता आहे, कार्यकर्त्यांच्या सुख दुःखात सहभागी होणारा नेता आहे. स्व बाळासाहेब ठाकरे आणि आनंदजी दिघे साहेबांच्या संस्काराची शिदोरी घेऊन शिंदे साहेब महाराष्ट्र हितासाठी अहोरात्र धडपड करतायत. यामुळे आपल्याला देखील शिंदे साहेबांचे हात बळकट करण्यासाठी पक्ष संघटन वाढवावे लागणार आहे. असे शिवसेना सचिव भाऊसाहेब चौधरी यांनी पदाधिकाऱ्यांना संबोधित केले.

# महाराष्ट्रातील कुरेशी समाजाला जोपर्यंत मागण्या व न्याय मिळत नाही तो पर्यत आमचा लढा चालूच राहणार बीड जिल्ह्यातील सर्व चिकन मटन व पशू हत्या बंद करण्यात येत नाहीत तोपर्यंत संपूर्ण ताकतीने सरकारशी लढणार .. समाजसेवक .मुस्ताक कुरेशी

## जिल्हाधिकारी साहेब चिकन मटण व पशु हत्या बंद करण्यासाठी आदेश लवकर काढावे....

माजलगांव ।प्रतिनिधी

महाराष्ट्र मध्ये कुरेशी समाजाने पशु खरेदी विक्री बंद पुकारले आहे कुरेशी समाजाला काही गुंडे तर्फे त्याच्या वाहने अडवण्याचा प्रयत्न करणे जनावरे लुटणे तसेच त्यांच्यावर खोटे गुन्हे दाखल करणे माहित नसताना पण त्यांना तुम्ही जनावरे कत्तलीसाठी घेऊन जात आहे असे आरोप लाऊन मारहाण करणे असे घटना सारखे कुठे ना कुठे घडत आहे

तसेच पोलीस प्रशासन तर्फे कुरेशी समाजाच्या लोकांना मदत मिळत नाही व्यापारी वरती खोटे गुन्हे दाखल होत आहे व प्रशासनांनी मोका हा कायदा मंजूर केला असल्याने आज व्यापार करणे खुप अवघड झाले आहेत.जर जनवारे कत्तल करणे व वाहतूक करणे व्यापार करणे असे अवघड झाल्यामुळे कुरेशी समाजानी बंद पुकारले आहेत तर बीड जिल्ह्यातील सर्व चिकन मटन व पशु हत्यापण शासनाने तात्काळ बंद करावे.जो पर्यत कुरेशी समाजाला न्याय मिळत नाही व मोका कायदे रद्द करण्यात येत नाही तो पर्यंत चिकन मटन व पशु हत्या बंद करण्यात यावे. आज शेतकरी यांना जनवारे बाजारात घेऊन जाण्यासाठी भितीचे वातावरण निर्माण झाले काही गुंडे रस्त्यावर थांबा ऊन वाहने अडवण्यात आणि जनावरे घेऊन जाणारा लोकांना व वाहतूक करणाऱ्या ड्रायव्हर लोकांना मारहाण करण्यात येते व वाहनतील जनवारे सोडून गोशाळात टाकुन देत आहे असे घटना रोज घडत आहेत.

जमियतुल कुरेशी समाजाचा अन्यायाविरुद्धचा प्रखर लढा!

कुरेशी समाजाने महाराष्ट्र मध्ये पुकारलेलाआहे व पशु खरेदी-विक्री बंद आंदोलन हा केवळ एक व्यवसाय थांबवण्याचा निर्णय नाही, तर त्यांच्यावर होणाऱ्या अमानुष हल्ल्यांविरुद्ध, खोट्या आणि मनमानी केसेसविरुद्ध, तसेच वर्षानुवर्षे सुरू असलेल्या घोर अन्यायाविरुद्ध पुकारलेला हा एक प्रखर आणि निर्णायक लढा आहे. हा 'बायकॉट' केवळ तात्पुरता बंद नसून, आपल्या हक्कांसाठी आणि सन्मानासाठी दिलेला हा एक अस्तित्वाचा लढा आहे, जो आता अधिक तीव्र आणि प्रभावीपणे लढला जाईल!

अन्यायाची परिसीमा: सहनशीलतेचा अंत! गेली अनेक वर्षे कुरेशी समाज शांतताप्रियपणे आपला पारंपरिक पशुधन व्यवसायात कार्यरत आहे. मात्र, 'गोरक्षणा'च्या नावाखाली काही समाजकंटकांकडून त्यांच्यावर होणारे अमानुष हल्ले, जीवघेणी मारहाण आणि वाहनांची जाळपोळ हे आता नित्याचे झाले आहे. इतकेच नाही, तर त्यांना कायद्याच्या कचाट्यात ओढण्यासाठी बिनबुडाचे आणि खोटे गुन्हे दाखल केले जात आहेत. यामुळे त्यांचे जीवन आणि उपजीविका दोन्ही धोक्यात आले आहे. कुटुंबाचे पोट भरणेही मुश्कील झाले आहे. या अन्यायाने आता सहनशीलतेचा अंत झाला आहे. कुरेशी समाज आता या अन्यायाविरुद्ध एकजुटीने उभा राहिला आहे!

'बायकॉट'ची वज्रमुठ: व्यवस्थेला हादरवणारी शक्ती!

हा 'बायकॉट' म्हणजे केवळ एक व्यावसायिक निर्णय नाही, तर तो व्यवस्थेला हादरवून सोडण्याची वज्रमुठ आहे. जेव्हा हजारो वर्षांचा पारंपरिक व्यवसाय करणारा एक मोठा कुरेशी समाज असून पशुधन खरेदी-विक्री, मांस उद्योग आणि यावर अवलंबून असलेले हजारो कोटींचे व्यवहार ठप्प झाला असून राज्याच्या आणि देशाच्या अर्थव्यवस्थेवर याचा गंभीर परिणाम पण झाला आहे

आत्मसन्मानाची मशाल: हा 'बायकॉट' म्हणजे आत्मसन्मानाची मशाल आहे. आपल्या हक्कांसाठी, आपल्या सुरक्षिततेसाठी आणि न्यायासाठी लढण्याची प्रेरणा यातून मिळेल. हा लढा केवळ कुरेशी समाजाचा नाही, तर हा न्याय आणि समानतेच्या तत्त्वांचा लढा आहे.

आता निर्णायक लढ्याची वेळ!

कुरेशी समाजाचे हे आंदोलन आता केवळ व्यवसाय बंद ठेवण्यापुरते मर्यादित राहणार नाही, तर ते न्याय मिळेपर्यंत आणि अन्यायाची पाळेमुळे समूळ उपटून टाकेपर्यंत सुरू राहील. प्रत्येक हल्लेखोर आणि खोटे गुन्हे दाखल करणाऱ्यांवर कठोर कारवाई झालीच पाहिजे. कुरेशी समाजाला सन्मानाने, निर्भयपणे आणि सुरक्षितपणे आपला व्यवसाय करण्याचा कायदेशीर अधिकार मिळालाच पाहिजे तो पर्यंत न्याय मिळत नाही तो पर्यंत बीड जिल्ह्यातील सर्व चिकन मटन व पशू हत्या बंद करण्यात यावे.

कुरेशी समाजाला न्याय मिळत



नाही तो पर्यत बीड जिल्ह्यातील सर्व चिकन मटन व पशू हत्या बंद करण्यात यावे.नसता लोकशाही मार्गाने विविध स्वरूपाचे आंदोलन पुकारले जाईल अशी मागणी महाराष्ट्र युवक प्रतिष्ठान च्या वतीने उपविभागीय अधिकारी यांना तक्रार देऊन मागणी करण्यात आली आहे

# राज्यस्तरीय टेनिस क्रिकेट स्पर्धेसाठी बीड जिल्हा संघ निवड चाचणीचे आष्टीत आयोजन

## ९ ऑगस्ट रोजी तालुका क्रीडा संकुल मैदानावर निवड चाचणी; आ.सुरेश धस यांच्या हस्ते उद्घाटन

आष्टी (प्रतिनिधी)

सोलापूर जिल्ह्याच्या अकलुज येथे १९ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आलेल्या १७ वर्षांखालील राज्यस्तरीय टेनिस क्रिकेट स्पर्धेसाठी बीड जिल्हा संघ निवडण्यासाठी आष्टी येथे निवड चाचणी आयोजित करण्यात आली आहे. ही निवड प्रक्रिया शनिवार दि. ९ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता, आष्टी - जामखेड रस्त्यालगत हंबर्डे महाविद्यालय शेजारील तालुका क्रीडा संकुलाच्या मैदानावर होणार आहे. या स्पर्धेचे उद्घाटन बीड जिल्हा टेनिस क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष तथा आष्टी मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांच्या हस्ते होणार असून, या कार्यक्रमाला खेळाडूंसह क्रीडाप्रेमींची उपस्थित राहणार आहेत.

या निवड प्रक्रियेमध्ये केवळ १७ वर्षांखालील नव्हे तर १४ वर्षे वयोगट आणि १९ वर्षे वयोगट



यांच्यासाठीही बीड जिल्हा संघ निवडला जाणार आहे. निवडलेले संघ बीड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये करतील. बीड जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवा खेळाडूंनी या निवड चाचणीत सहभागी व्हावे, असे आवाहन बीड जिल्हा टेनिस क्रिकेट संघटनेचे सचिव सुशील तांबे, उपाध्यक्ष अविशांत कुमकर यांनी केले आहे.

# कौटुंबिक नात्याचा कित्येक दशकांचा मधुर प्रवास

आष्टी (प्रतिनिधी)

भक्ती रस निर्माण करण्याची ताकद परमार्थात असते. संतांच्या कृपेने मनुष्याचे जीवन सार्थकी लागते. उत्तम आचार विचार दृष्टी व कृती श्रेष्ठ पदावर नेते. कौतुक करायला शब्द नव्हे; तर भावना लागतात! या अत्यंत महत्त्वाच्या वाक्यातून जीवनाचा बोध होतो. या अनुषंगाने निस्वार्थपणे इतरांच्या सुखद वाटचालीसाठी प्रमाणिकपणे कर्तव्य भावनेतून प्रवास करणारे माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे आपल्या नातवांसमवेत शुभेच्छा देण्यासाठी जातात. हा त्यांचा कौटुंबिक पारिवारिक स्नेह त्यांच्या संस्कारमय नात्यातील गोडव्याचा एक भाग आहे.

कर्म सेवामय झाले की जीवन सुगंधित होते. बाभळीचे झाड पावलोपावली आढळते; परंतु चंदन शोधावे लागते. या वचनाप्रमाणे श्वासाबरोबर ध्यास घेऊन जगा ही धोंडेसाहेबांची जगण्याची रीत पत्रकार उत्तम बोडखे यांच्या मनाला पटते. पवित्र मनाच्या शेतीतून अमृताची फळे यावेत त्यानुसार राजकारण, समाजकारण, शिक्षण, संस्कृती, संस्कार, लेखन, चिंतन वाचन या मूल्यांतून होत असणारा या द्वयींचा कित्येक दशकापासूनचा अत्यंत दमदार खडतर आणि तितकाच हसतमुख प्रवास नक्कीच सर्वसामान्यांसाठी प्रेरणेचा भाग आहे.मंगळवारी माजी आमदार लोकनेते भीमराव धोंडे साहेबांचा अभिष्टचिंतन सोहळा आणि या शुभ दिनी पत्रकार उत्तम बोडखे यांनी दिलेल्या शुभेच्छा एक अवर्णनीय आणि आनंदी असा क्षण आहे! हा टिपण्याची कौशल्य अर्थात छायाचित्रकाराचे आहे!



# जे.एस.पी.एम.नर्हे टेक्निकल कॅम्पस पुणे येथे नॅशनल स्टॉक एक्सचेंज(एन.एस.इ.) मार्फत

## एक दिवसीय स्मार्ट निवेशक जागरूकता कार्यक्रम संपन्न

पुणे/प्रतिनिधी

दिनांक ०६ ऑगस्ट २०२५ रोजी जे.एस.पी. एम.नर्हे,टेक्निकल कॅम्पस पुणे येथे भारत सरकारच्या भारतीय प्रतिभूती व विनिमय बोर्ड अर्थात (सेबी) तसेच नॅशनल स्टॉक एक्सचेंज(एन एस इ) च्या माध्यमातून अभियांत्रिकी विद्यार्थ्यां साठी एक दिवसीय स्मार्ट निवेशक जागरूकता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाचे आयोजन सिव्हिल डिपार्टमेंटचे चे विभाग प्रमुख डॉ.एस.बी.खपले सर व मेकॅनिकल



डिपार्टमेंटचे डॉ.एम.ए. कुंभलकर सर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून(सेबी) तसेच एन.एस.इ.चे सेक्युरिटीज मार्केट ट्रेनर श्री.गणेश चौधरी सर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना आर्थिक नियोजनाचे मार्गदर्शन केले.यात त्यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीयकृत बँकेत तसेच पोस्ट ऑफिसमध्ये असलेल्या विविध योजना,डिमॅट अकाउंट,शेअर मार्केट, म्युच्युअल फंड व इतर शासकीय योजनांचे मार्गदर्शन केले.तसेच गुंतवणूक करत असताना विद्यार्थ्यांनी काय काळजी घ्यावी व फसवणूक करणाऱ्या योजनांपासून सावध राहण्याच्या सूचना दिल्या.हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी प्रा.एस. बी.बनसोडे सर,डॉ. नंदजी कानू सर यांनी विशेष परिश्रम घेत कार्यक्रमाचे आयोजन, नियोजन तसेच सूत्र संचालन केले.या कार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सुंदरराव सोळंके महाविद्यालयात पाच हजार वृक्षांची लागवड

## सोळंके महाविद्यालय व नगर परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण

माजलगाव (प्रतिनिधी)

सुंदरराव सोळंके महाविद्यालय व नगर परिषद माजलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या परिसरात दिनांक ७ ऑगस्ट रोजी पाच हजार झाडांची लागवड करण्यात आली. सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने ' एक पेड मां के नाम २.०' योजने अंतर्गत व महाराष्ट्र शासनाच्या 'हरित महाराष्ट्र समृद्ध महाराष्ट्र,झाडे लावूया प्रदूषण मुक्त भारत बनवूया या' योजनेअंतर्गत नगर परिषद माजलगाव व सुंदरराव सोळंके महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या परिसरात जवळपास ५००० झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. वृक्षारोपणा दरम्यान विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. यावेळी प्राचार्य डॉ.जी. के. सानप, प्रभारी प्राचार्य डॉ. एन. के. मुळे, नगर परिषदचे मुख्याधिकारी पोपट निघळ, उपप्राचार्य प्रकाश गवते, उपप्राचार्य पवनकुमार शिंदे, एन.एस. एस.कार्यक्रमाधिकारी प्रा. उमेश राठोड, प्रबंधक प्रशांत चव्हाण, के. बी.भोंडवे, एकनाथ मस्के,न.प चे विघ्नेश मुंडे,शिवहर शेटे,आयुब पठाण, अजय मुंडे, विशाल टाकणखार, अक्षय धारक यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी तसेच नगरपरिषद कर्मचारी , महाविद्यालयातील विद्यार्थी -विद्यार्थिनी यांनी वृक्षारोपणामध्ये सक्रिय सहभाग घेऊन वृक्षारोपण केले. यावेळी वृक्षारोपण केलेल्या झाडांचे संगोपन करून झाडे वाढविण्याचा निर्धार सर्वांनी व्यक्त केला.

# दिव्यांग कल्याण विभाग, मंत्रालय,मुंबई सचिव, पदावर श्री.तुकाराम मुंढे, यांच्या निवडीने दिव्यांग बांधवामध्ये आनंदी वातावरण - जीलानी शेख

पाटोदा (प्रतिनिधी)

दिव्यांग कल्याण विभाग, मंत्रालय,मुंबई सचिव, पदावर श्री.तुकाराम मुंढे, भाप्रसे, यांची निवड झाल्याने दिव्यांग बांधवात आनंदाचे वातवरण झाले आहे. बऱ्याच दिवसापासुन दिव्यांग बांधवाचे रखडलेले प्रश्न कोणी सोडवत नव्हते

त्यामुळे दिव्यांग बांधव फार आडचणीत आला होता बोगस दिव्यांगानी शासनाला फसवुन बोगस नोकऱ्या मिळवील्या आहेत तसेच बोगस दिव्यांग संस्थाचा देखील फार मोठे जाळ निर्माण झालेले आहे त्याला पण आळा बसणे आवश्यक आहे.



सर्वात जास्त बोगस दिव्यांग प्रमाणपत्र धारक बीड जिल्हायात आहेत वनफोर योजनेचा लाभ घेत आहेत तसेच बीड जिल्हायात बोगस शिक्षक बदली प्रकरण फार गाजले होते ते दाबले गेले ते पुन्हा ओपन करून त्यांच्यावर कार्यवा

# आमदार सुरेश आण्णा धस यांना मराठवाडा भूषण पुरस्कार जाहीर

पाटोदा (प्रतिनिधी)

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त मराठवाडा सेवा संघातर्फे यंदाचा मराठवाडा भूषण पुरस्कार आष्टी पाटोदा मतदार संघाचे आमदार सुरेश आण्णा धस यांना जाहीर करण्यात आला आहे. पुणे येथे मराठवाडा सेवा संघाचे निळकंठ शेळके पाटील आणि राहुल नागरगोजे यांनी ही माहिती दिली.मराठवाडा सेवा संघ दरवर्षी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या निमित्ताने सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार प्रदान करते. आमदार सुरेश आण्णा धस यांनी मराठवाड्याच्या विकासासाठी आणि



जनतेच्या कल्याणासाठी केलेल्या कार्याची दखल घेऊन त्यांना हा सन्मान जाहीर करण्यात आला आहे.निळकंठ शेळके पाटील म्हणाले, आमदार सुरेश धस यांनी मराठवाड्याच्या प्रगतीसाठी आणि जनतेच्या हितासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. त्यांच्या योगदानाचा गौरव म्हणून हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात येणार आहे. राहुल नागरगोजे यांनीही धस यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक करत या पुरस्कारामुळे मराठवाड्यातील जनतेला प्रेरणा मिळेल, असे सांगितले.हा पुरस्कार पुणे येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या कार्यक्रमात प्रदान करण्यात येणार असून, यावेळी मराठवाड्यातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. मराठवाडा सेवा संघाने सर्वांना या कार्यक्रमात सहभागी होण्याचे

# परळी येथील खुनाच्या प्रकरणी नागरिकांना एसआयटी प्रमुख आयपीएस अधिकारी पंकज कुमावत यांचे आवाहन

**बीड/प्रतिनिधी**

**परळी वैजनाथ जि.बीड येथे महादेव दत्तात्रय मुंडे यांच्या हत्येप्रकरणी पोलिसांनी महत्त्वाची माहिती असलेल्या नागरिकांना पुढे येण्याचे आवाहन केले आहे.दि. २९ ऑक्टोबर २०२३ रोजी रात्री ८ ते ९ वाजता परळी कोर्टा समोर गोळ्या झाडून त्यांची हत्या झाली होती.**

याप्रकरणी परळी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद असून कलम ३०२



भा.दं.वि.अंतर्गत तपास सुरू आहे.गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेण्यासाठी आयपीएस अधिकारी पंकज कुमावत यांच्या अध्यक्षतेखाली विशेष तपास पथक नेमण्यात आले आहे. जर कोणाकडे या प्रकरणी कोणतीही महत्त्वाची माहिती असेल तर ती थेट आयपीएस पंकज कुमावत यांना मोबाईल क्रमांक९९२३०७२८३३वर देता येईल.पोलिसांना माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवले जाईल तसेच त्यांची ओळख उघड केली जाणार नाही असे स्पष्ट केले आहे.तसेच योग्य माहिती देणाऱ्यास उचित बक्षीस दिले जाणार आहे.



# मतदारसंघातील विविध योजनांच्या अंमलबजावणीसाठी ठोस निर्णय घेतले-आ. धस

पाटोदा (प्रतिनिधी)

जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री मा.ना. अजितदादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील विविध महत्त्वाच्या विषयांवर आढावा बैठक पार पडली. यावेळी आ. सुरेश धस यांनी मतदारसंघातील विविध योजनांच्या कामासंदर्भात चर्चा केली तसेच मल्टीस्टेट याबाबत बीड जिल्हाधिकारी कार्यालयात दि.५ रोजी उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री मा.ना. अजितदादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील विविध महत्त्वाच्या विषयांवर आढावा ढावा बैठक पार पडली. यावेळी आ. सुरेश धस यांनी चर्चा केली तसेच या बैठकीत ठेवीदारांची फसवणूक झालेल्या मल्टीस्टेट व खाजगी पतसंस्थांवर तातडीने कठोर कार्यवाही करून संबंधित संस्थांची संपत्ती विकून ठेवीदारांना पैसे परत मिळावेत, यासंदर्भात महत्त्वपूर्ण चर्चा झाली. जिल्ह्यातील ज्ञानराधा मल्टिस्टेट, साईराम अर्बन, राजस्थानी मल्टीस्टेट व अन्य १५ह्व२० संस्थांवर कारवाईच्या सूचना दिल्या तसेच महावितरण अंतर्गत सौर कृषीपंप योजना, सबस्टेशन व रोहित्र उभारणी, शेतकऱ्यांना वेळेत सोलर संच मिळावेत यासाठी आवश्यक सूचना करण्यात आल्या.व आष्टी, पाटोदा व शिरूर कासार तालुक्यातील योजनांच्या अंमलबजावणीसाठीही ठोस निर्णय घेण्यात आले. व बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी राज्य शासनाने पाठबळ द्यावे, तसेच अल्प दराने कर्ज सुविधा उपलब्ध करून लघुउद्योजक व शेतकऱ्यांना मदत व्हावी, यावरही सविस्तर चर्चा झाली. तसेच जिल्ह्यातील क्रीडा संकुल विकास, जागा उपलब्धता, अतिक्रमण हटविणे आणि आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात आले. या बैठकीस आ. सुरेश धस. आमदार प्रकाशदादा सोळंके, आमदार वसंत काळे, आमदार सतीश चव्हाण, आमदार संदीप क्षीरसागर, आमदार विजय राजे पंडित, राज्याचे सहकार सचिव तावरे, पालक सचिव. वाघमारे, सचिव राजेश देशमुख, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, पोलीस अधीक्षक. नवनीत कॉवत, मुख्य कार्यकारी अधिकारी. जितीन रेहमान व विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# कोंडिबा जयवंत कवले यांचा विज पडून मृत्यू

परळी (प्रतिनिधी)

शहरातील वैद्यनाथ मंदिर परीसरातील रहिवाशी कोंडिबा जयवंत कवले (वय ४८) यांचा नागापूर येथील शेतात विज पडून मृत्यू झाला तर पत्नी किरण जखमी झाल्या आहेत. शहरातील वैद्यनाथ मंदिर परीसरातील रहिवाशी कोंडिबा जयवंत कवले यांचे तालुक्यातील नागापूर येथे शेती आहे. शेतात पत्नी किरण सह खत पेरणीसाठी गेले असता सायंकाळी ५.३० च्या सुमारास अचानक विजेचा गडगडाट व पावसाला सुरूवात झाली. यामुळे कोंडिबा व किरण शेतातील लिंबाच्या झाडाखाली उभे राहिले असता विज पडली यामध्ये कोंडिबा कवले यांचा जाग्यावर



मृत्यू झाला व पत्नी किरण जखमी झाल्या आहेत. परिसरातील शेतकऱ्यांनी तात्काळ बैलगाडी मध्ये गावात आणून तिथून दवाखान्यात दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. त्यांच्यावर शुक्रवारी (ता.०८) दुपारी बारा वाजता विरशैव स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत त्यांच्या पश्चात पत्नी,एक मुलगा,एक मुलगी, भाऊ असा परिवार आहे. यासंदर्भात तलाठी, मंडळ अधिकारी यांना यासंदर्भात माहिती देण्यात आली आहे.

# राळेसांगवी येथे अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यास शनिवारपासून सुरुवात

मानूर (प्रतिनिधी)

शिरूरकासार तालुक्यातील राळेसांगवी येथे संत भगवान बाबा, वामनभाऊ महाराज व स्वामी निगमानंद महाराज यांच्या आशीर्वादाने, महंत विठ्ठल महाराज गहिनीनाथ गड यांच्या मार्गदर्शनाखाली व महंत स्वामी जनार्दन महाराज यांच्या शुभहस्ते अखंड हरिनाम सप्ताह आणि ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याला शनिवार, ९ ऑगस्ट पासून सुरुवात होणार आहे.या सप्ताहात दररोज पहाटे काकडा भजन, विष्णुसहस्रनाम, ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, भावार्थरामायण, प्रवचन, हरिपाठ आणि हरिकीर्तन यांचे आयोजन करण्यात आले आहे.सप्ताहात प्रवचनासाठी जनार्दन महाराज मच्छिंद्रगडकर, अशोक महाराज खेडकर, सुरेश महाराज थिटे, दत्तात्रय महाराज खेडकर, इंद्रभान महाराज खेडकर, लक्ष्मण महाराज खेडकर, विश्वनाथ महाराज खेडकर हे उपस्थित राहणार आहेत.


कीर्तनासाठी अतुल महाराज शास्त्री (तागडगाव), राम महाराज शास्त्री (आळंदी), लक्ष्मण महाराज फड (खडकवाडी), स्वामी जनार्दन महाराज (मच्छिंद्रगड), रामेश्वर महाराज शास्त्री (ब्रम्हनाथ येळंब), नवनाथ महाराज शास्त्री (भालगाव), गणेश महाराज शास्त्री (भिलवडे) हे कीर्तनकार उपस्थित राहतील.

शनिवार, १६ ऑगस्ट रोजी सप्ताहाची सांगता महंत विठ्ठल महाराज गहिनीनाथ गड यांच्या काल्याच्या कीर्तनाने होणार असून, त्यानंतर महाप्रसाद होईल.पूर्णिमा महोत्सवानिमित्त संदेश महाराज घुगे (भगवानगड) यांचे कीर्तन होणार आहे.या सप्ताहात विणेकरी, हार्मोनियम, गायनाचार्य व मृदंगाचार्य सप्ताहात सातही दिवस हजेरी लावणार असून, या सप्ताहातचा लाभ घ्यावा, असे आवाहन राळेसांगवी ग्रामस्थांनी केले आहे.









पुणे - गेली सहा सात वर्षे परिचिती पुणे महानगरपालिका आयुक्त वरिष्ठ आय ए एस ऑफिसर नवल किशोर राम,पुणे नागपूर मेट्रो कमिशनर श्रावण हर्डीकर,पुणे इन्कम टॅक्स कमिशनर विश्वासराव मुंडे,पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र सर यांची पुणे येथे सदिच्छा भेट घेऊन त्यांना शुभेच्छा देताना वरिष्ठ पत्रकार तथा सचिव श्री क्षेत्र भगवानगड ट्रस्ट आणि मा.अध्यक्ष महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबईचे श्री गोविंद घोळवे सर.